
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २०६४



# स्वातीचा मेघ

REFBK-0009419
REFBK-0009419

सी. म. बापट

७३८३८
४।३।७१
५८२५
२०६४
काव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

प्रकाशन क्रमांक

2068

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

दा. क्र. ९४१८

# स्वातीचा मेघ

## (कविता संग्रह)

कवि—

सी. म. बापट

REFBK-0009419

किंमत
अडीच रुपये

नागपूर प्रकाशन

नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर

प्रकाशकः-
दि. मा. धुमाळ
नागपूर प्रकाशन
सीताबर्डी, नागपूर

★

पहिली आवृत्ति
१९५७

※

सर्व हक्क लेखकाधीन

※

मुखपृष्ठावरील चित्र
श्री. के. बी. कुलकर्णी
'चित्रमंदीर-बेळगाव'
यांचें आहे.

★

मुद्रकः-
ल. म. पटले
रामेश्वर प्रिंटिंग प्रेस
सीताबर्डी, नागपूर

# वृष्टीपूर्वी

कवि श्री. **सी. म. बापट** यांचा हा चवथा कवितासंग्रह वाचकांच्या हातीं देतांना मला एक प्रकारचें समाधान वाटत आहे यापूर्वींचे त्यांचे दोन संग्रह अन्यत्र प्रकाशित झाले. त्यांचा तिसरा काव्यसंग्रह "**रानगुलाब**" पांच वर्षांपूर्वी मी प्रसिद्ध केला होता. मात्र त्यानंतर कवितेचें पुस्तक प्रकाशनासाठीं हातीं घ्यावयाचें नाही, असा मनाशीं मी ठाम निश्चय केला होता. परंतु त्याला कलाटणी देण्याचा प्रसंग पुन्हा माझ्यावर येईल, अशी अंधुकहि कल्पना त्यावेळीं मला झाली नव्हती. मानवी संकल्पाशीं नियतीचा विरोध असतो हेंच खरें !

काव्यपुस्तकांचें प्रकाशन हा एक शंभरटक्के अंगलट येणारा व्यवहार ठरतो, हा माझ्याप्रमाणेंच इतर प्रकाशकांचाहि कटु अनुभव असूं शकेल. त्याखेरीज प्रतिकूल परिस्थितीच्या जोडीला पुस्तकविक्रेते आणि ग्राहक यांची अशा पुस्तकाकडे काणाडोळा करण्याची बळावत जाणारी प्रवृत्ति, यामुळें काव्य चांगलें असून देखील त्याचें प्रकाशन करण्याचा विचार, या आर्थिक ओढाताणीच्या दिवसांत, मनाच्या उंबरठ्यांत पाय ठेवूं शकत नाही.

सुमारें दोन अडीच वर्षांपूर्वी श्री. **बापट** यांच्या निवडक कवितांचें हस्तलिखित अवलोकनासाठीं म्हणून मी मागवून घेतलें होतें आणि तें सुद्धां कांहीशा अनिच्छेनेंच ! पण वरील कारणांमुळें तें माझ्या कपाटांत बंदीस्त होऊन पडलें होतें व तें प्रसिद्ध करण्याचा बेत माझ्या मनांत मूळ धरत नव्हता.

श्री. बापटांचा व माझा स्नेह दहा वर्षांमागें केवळ योगायोगानेंच जमून आला, कारण त्यांच्या व माझ्या वास्तव्यस्थानांत तसेंच मनोवृत्तींतहि ' दोन ध्रुवां ' चें अंतर होतें. शिवाय ते जितके भावनाप्रधान तितकाच मी व्यवसायाच्या बंधनांनीं मनानें रूक्ष बनलेला! तथापि पहिल्यापासून त्यांच्या कवितेबद्दल मला आपुलकी वाटत होती. माझ्याप्रमाणेंच अनेक हालअपेष्टांतून त्यांच्याहि आयुष्याची आतांपर्यंत वाटचाल झाली असल्यानें त्यांच्या कवित्वाविषयीं माझ्या अंतर्यामीं ' समानधर्मत्व ' निर्माण झालें असल्याचाहि बराच संभव आहे.

गेल्या दहा वर्षांत श्री. बापटांचे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध होऊं शकले. यावरून त्यांची कविता बऱ्यापैकीं असावी, असा माझा समज होणें स्वाभाविक आहे. परंतु भिडस्त स्वभाव आणि प्रसिद्धिपराङ्मुखता या कारणानीं त्यांची कविता सरस असूनहि जेवढी प्रकाशांत यावयास हवी होती, तेवढी ती येऊं शकली नाही, असें माझें प्रांजल मत आहे. म्हणून त्यांच्या निरलस काव्यसेवेनें व सरल सौहार्दानें भारावून जाऊन हा " **स्वातीचा मेघ** " प्रकाशित करण्याचें धाडस मी करीत आहे.

श्री० बापट हे एक निष्ठावंत निसर्गपूजक कवि आहेत. य पूर्वींच्या त्यांच्या काव्यसंग्रहांत त्यांचें अत्युत्कट निसर्गप्रेम प्रगट झालें आहे आणि या संग्रहांतहि त्याचा आढळ अगदीं ठळकपणानें येतो. पवित्र कृष्णानदीच्या आसमंतांत त्यांचें बालपण गेलें व तेथील निसर्गाच्या शीतळ छायेंत त्यांची प्रतिभा विद्यार्थीदशेंत पल्लवित झाली. या गोष्टीची साक्ष " कृष्णेच्या परिसरांत " व " हिरवें माहेर " या कविता देऊं शकतील. सृष्टिसौंदर्याचे विविध

रंगतरंग आणि नादनिनाद कृष्णेच्या प्रवाहाप्रमाणें त्यांच्या कांही कवितांमधून अविरतपणें पाझरत आहेत.

तथापि त्यांची कविता केवळ निसर्ग-पूजनांत रमून जाते असें मात्र नाही ! सभोंवार पसरलेल्या विशाल जीवनाची आणि बहुरंगी जगाची स्पष्ट चाहूल तिला लागली आहे. वैयक्तिक आशा—निराशेच्या रिंगणातच फिरत न राहतां इतरांच्या सुख-दुःखांची उकल करण्याचा ध्यास तिनें घेतला आहे. ' जाऊं दे मज दूर ' या कवितेंत त्याचें प्रतिबिंब उमटलें आहे. सध्याचें सारें जीवन विफलता व उबग यांनीं ग्रासून टाकलें आहे. जीवनमूल्यांवरची माणसाची श्रद्धा दिवसेंदिवस ओसरत चाललेली आहे. त्यामुळें बापटांच्याहि कवितेवर अगतिकता आणि निराशा यांची सावट पडणें साहजिक आहे. पण ही कोंडी फोडून बाहेर पडण्याची त्यांची अनिवार ओढ " उजळल्या दिशा " व " उघड तूं पंख " या सारख्या कवितांतून व्यक्त झाल्याचें दिसून येतें. " गाऊं कशाचें गीत " व " का लिहितो मी कविता " या गीतांमधून त्यांच्या कवित्वाची बैठक कशा प्रकारची आहे तें कळून येतें; त्याबरोबरच त्यांचा दुर्दम्य आशावाद आणि मानवतेबद्दल त्यांना वाटणारी तीव्र आत्मीयता यांचें सुस्पष्ट दर्शन होतें. " उघड तुझें भांडार " ही ओजस्वी कविता वाचून ते मानवतावादी कवि आहेत, ही सहज जाणीव होते.

" नटराज, विस्मृता, देवाचा शोध, राजघाट " इ० करुण-गंभीर विषयांप्रमाणें " तृण, कावळा, मातीचे कण (काळे मोती), सुरवंट " यांसारख्या सामान्य विषयांचेंहि चित्रण त्यांची लेखणी तितक्याच कुशलतनें करूं शकते, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

भावमधुर प्रेमगीतांची रचना हा त्यांच्या प्रतिभेचा एक विशेष चमकदार पैलू आहे. या संग्रहांतील त्यांचीं त्या विषयावरचीं सुरस आणि सुबोध गीतें, वरील विधानाची सत्यता पटवून देतील.

" स्वातीचा मेघ " या नांवांतहि एक गोड आकर्षण आहे. त्याच्या जलबिंदूंपासून मोती तयार होतात, असा एक संकेत प्रचलित आहे. त्याच मथळ्याची या संग्रहांतली पहिलीच कविता मी वाचली आणि माझे डोळे पाणावले. " स्वातीचा मेघांतून पाझरणाऱ्या जलकणांचे समुद्रांतल्या शिंपल्यांत पाणीदार मोत्यांचे दाणे बनतात पण धनवंतांच्या भांडारांत त्यांची भर होते आणि कष्टाळू गरीबांना साधे भाकरीचे दाणेहि दुर्मिळ होतात. असंख्य ' सजीव मोती ' जगाच्या पायदळीं पडून प्रत्यहीं पिचून जात आहेत, त्यांचा वाली कोण " ? हा श्री० बापटांचा सवाल हृदयाला चटका लावणारा आहे आणि त्यांतच त्यांच्या मानवताप्रेमी कविमनाची प्रचीति स्पष्टपणें येते.

प्रकाशक आणि एक काव्यवाचक या नात्यानें माझी भूमिका मी थोडक्यांत मांडली आहे. श्री. बापटांच्या कवितेवर अभिप्राय देण्याचा अधिकार रसिकांचा आहे. हा " **स्वातीचा मेघ** " मंदगतीनें क्षितिजावर डोकावत आहे. त्याचें आगमन मराठी काव्यरसिकांना स्वागतार्ह वाटल्यास माझे परिश्रम सफल होतील.

नागपूर
' दत्त जयंती '
दि. १७-१२-१९५६

**दि० मा० धुमाळ**

# अनुक्रमणिका


| कवितेचें नांव | पान | कवितेचें नांव | पान |
|---|---|---|---|
| १ स्वातीचा मेघ | १ | २६ आव्हान | ६१ |
| २ गाउं कशाचें गीत ? | २ | २७ हिरवें माहेर | ६३ |
| ३ उजळल्या दिशा | ४ | २८ कांचनमृग | ६५ |
| ४ उघड तुझें भांडार ! | ६ | २९ पहिला मेघ | ६८ |
| ५ गोड सोबत | ८ | ३० तृष्णा | ७२ |
| ६ विस्मृता | ११ | ३१ गोड स्वप्नें | ७४ |
| ७ दूरचा डोंगर | १५ | ३२ प्राणवठा | ७५ |
| ८ धरित्रीचा धनी | १६ | ३३ गुलमोहर | ७७ |
| ९ स्वप्नपक्षी | १७ | ३४ सावळें रूप | ८२ |
| १० नवा किनारा | २० | ३५ गुपित | ८४ |
| ११ काळे मोती | २३ | ३६ अमृतझरा | ८६ |
| १२ कावळा | २७ | ३७ कुळवाचे पडसाद | ८९ |
| १३ नटराज | २९ | ३८ याचक | ९२ |
| १४ तेजोबाण | ३२ | ३९ चंदाराणी | ९५ |
| १५ पहिला क्षण | ३५ | ४० कृष्णेच्या परिसरांत | ९७ |
| १६ रणांगणावर | ३६ | ४१ कशाला खेद करूं ! | १०० |
| १७ एकान्तींचा मेवा | ३७ | ४२ वडाच्या सावलींत | १०२ |
| १८ का लिहितो मी कविता | ४१ | ४३ उघड तूं पंख ! | १०५ |
| १९ राजघाट | ४३ | ४४ सदाफुली | १०८ |
| २० सुरवंट | ४५ | ४५ रानपरी | १११ |
| २१ शरदाची पहाट | ४९ | ४६ कधीं ? | ११४ |
| २२ श्रावणांतली रात्र | ५१ | ४७ गुलाबी सांज | ११५ |
| २३ अमर तृण | ५३ | ४८ कोंडाकणी | ११८ |
| २४ जाऊं दे मज दूर ! | ५७ | ४९ चिमणा स्वर्ग | १२० |
| २५ देवाचा शोध | ५९ | ५० वळणापाशीं | १२३ |

# आमची लोकप्रिय प्रकाशनें

| | | | |
|---|---|---|---|
| म्हणे लढाई संपली | १॥ | शलाका | २ |
| दोन प्रख्यात युद्धतंत्रें | २ | पासंग | २॥। |
| हंसदूत | २। | वटवृक्ष | ॥। |
| मार्क्सवादी अभ्यासक्रम | १॥ | यौवन | २ |
| इंदिरा | २॥। | भाग्यवती | १। |
| गोल देऊळ | ३ | आधुनिक मस्तानी | १। |
| काल समुद्रातील रत्नें | ४ | सावली | २॥ |
| लकेरी | २॥ | चिखलातलं कमल | ॥ |
| मधु | २॥ | विषप्याला | ॥ |
| विचित्रिता | २ | कुटीर उद्योग संघटन | १। |
| सं. पहिला कवि | १॥। | चंद्रावरचा डाग | ॥। |
| शापित उ:शापित | २ | दुर्गादर्शन आणि कविता | २ |
| कोणी कुणाचे नव्हे | ५ | नवी पहाट | २॥। |
| रान गुलाब | २॥ | स्वातीचा मेघ | २॥। |
| मी एकटीच जाणार | ३ | | |

नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर

# स्वातीचा मेघ

(सुनीत)

मराठी ग्रंथ संग्रहालय
९४१९

स्वर्गींचा गहिरा गुलाब लहरे गंभीर सिंधुजळीं
सांजेच्या कवळ्या मिठींत खुलल्या कोठावरी नारळी
चंदेरी पसरून पंख मचवा लाटांसवें वागडे
होते स्फुंदत शिंपले परि निळ्या भारातळीं वापुडे

स्वातीचा नवमेघ हंसगतिनें आला नभःप्रांगणीं
शुक्तींनीं चिमण्या मुठी उघडिल्या आनंदुनी तत्क्षणीं
लाभे रत्नकळा कशी जलकणां झेपावतां खालती
झालें जीवन आपुलें सफल, ही ये धन्यता त्यांप्रती

जाते हासत ती कुबेरसदनीं मुक्तावली लाजरी
भासे दुर्मिळ भाकरीहि गरिबां, लागे जिव्हारीं सुरी
दाता कोण असे ? धुळींत पडती मोती किती हे जिते
डांगोरा पिटल्याविना निववितें जीवां खरें दान तें !

देऊं मी पण कोठुनी प्रियसख्या, तो दिव्य ठेवा तुला
चित्ता लागुनि आंच लोचनपुटीं अश्रू झणीं दाटला !

# गाऊं कशाचें गीत ?

मी, गाऊं कशाचें गीत ?
करपुनि जाती हसऱ्या कलिका धगधगत्या आगींत
साखरलोणी भक्त कुणी तो
स्तब्ध मूर्तिच्या मुखीं लिंपितो
देव उपाशी उन्हांत खपतो !
पडतीं त्याचीं कढत आसवें धरतीच्या ओटींत
झेलुनि वर्मीं घाव धन्याचे
सावरितां जूं मानेवरचें
झिरपुनि गेलें वय मजुराचें
रुधिरस्तोत्रें पढतीं यंत्रें तीक्ष्ण सुळे परजीत
दुर्मिळ भासे अन्नाचा कण
अर्धनग्न ही दीन भिकारिण
बसे कडेला फिरुनी वणवण
रडतें अंकीं मुके लेंकरूं शुष्क स्तन चघळीत
मेळ घालितां दस लाखाचा
झिजला बोरू आयुष्याचा
कागद कोरा तरि नशिबाचा
कण्हतो आत्मा कारकुनाचा काजळल्या छपरींत
स्वैर जगाचें जहर पचवितां
जिची आटली यौवनसरिता

शून्य घरीं ती खिन्न देवता
पतिता म्हणुनी तिला हिणविती, रीतच ही विपरीत !
कष्टदशेचा शाप ललाटीं
यमदूतांची भंवती दाटी
गारठलीं गरिबांचीं घरटीं
मृत आशांच्या सडती काया हृययाच्या कबरींत
मोल गुणाहुनि जनीं धनाला
खचे कलेचा तुरा कोवळा
दडपित पायीं माणुसकीला
ढोंगी दुनिया पतंग गगनीं प्रगतीचे उडवीत
शांतिपाठ ते घुमती इकडे
दुमदुमती रण भेरी तिकडे
होत भयाकुल विश्व बापुडें
थयथय नाचे भस्मासुर हा लाल चिभा चाटीत
उसळे सागर कारुण्याचा
भग्न मनोरा भावि सुखाचा
विस्कटला पट संसाराचा
त्यास पुन्हा जुळवाया बघते वेडी माझी प्रीत !
झाडुनि वरचे राखेचे थर
देह घेउनी फिरुनी सुंदर
जीवन—पक्षी विहरे जगभर
मानवतेच्या मांगल्याचे मंत्र नवे घुमवीत !

# उजळल्या दिशा

( जाति-नववधू )

उजळल्या दिशा झणि ये सखया !
चल खुल्या अंगणीं विहराया

खुले नभाचा निळा पिसारा
झळकत हिरवा लाख मनोरा
उसळे झरझर कांचनधारा
हा काजळदर्या जात लया

आनंदें तृणपानें डुलतीं
खगमाला किति मंजुळ गाती
झुळझुळती सुखलहरी भंवती
थरकांपे अशि का तव काया !
वेड विलक्षण कीं तुज लागे
म्हणसी, "जीवन किडलें अवघें"
वैफल्याचे पिंजत धागे
घरकुलांत झुरसी कां वांया ?
मधुसिंचन करि आशा सुंदर
पालवती नव कोमल अंकुर
रम्य असे संसार खरोखर !
तो स्वर्ग वसे भूवरती या

घुटमळसी कां अजुनी दारीं
हसत मुखानें पहा, समोरीं
यशोवधू ही उभी लाजरी
हो साहस भूषण तरुणवया !

भिरकावुनि पट नैराश्याचा
वन्हि चेतवी चैतन्याचा
तट भेदाया ध्येयपथींचा
क्षण मंगल वितरी बल हृदया

त्रिपदा जणुं सुरधेनू गमती
रिते घट पुन्हा रसें दाटती
वणव्यामधुनी वसंत फुलती
नच भीत शूर कधि पराजया !

साहुनि धीरें प्रहार सारे
जा, चढुनी प्रगतीचीं शिखरें
खंत नसो पडलास तरी रे !
पदरेणु शिरीं तव घे दुनिया

# उघड तुझें भांडार !

(जाति-गोविंद)

उघड तुझें भांडार, कुबेरा !
ये नच कां तव कानीं जळत्या हृदयांचे चित्कार ?

चहुबाजूला भडके ज्वाला
सुचती कैसे विलास तुजला !
बघ डोकावुनि, दारीं आला परजित काळ कुठार

माजे भंवती घोर धुमाळी
सारी दुनिया व्याकुळ झाली
परकष्टांवर पुष्ट होउनी काढिसि कां फूत्कार ?

लाल तुफानी लोंढयापुढती
प्रचंड पर्वत दुखंड होती
दगडविटांचा दुबळा तट हा काय तिथे टिकणार ?

कांपे धरिती क्रोधें थरथर
धुळीत पडती धुंद शिकंदर
सावध हो, तुज दग्ध करिल ही धनतृष्णा अनिवार

सारुनि झापड डोळ्यावरची
खोल कवाडें कोठाराचीं
प्रासादाचें भव्य तुझ्या हें विश्व ठरो आवार !

तीच खरी श्रीमंती गमते
दुःख जिला गरिबांचें दिसतें
झेलुनि अश्रू उजळी त्यांचे काजळले संसार

फिरतीं उघडीं तव भावंडें
दीनमुखें पाहतीं तुजकडे
आपुलकीची घालुनि पाखर घे त्यांचा कैवार

आक्रंदन हें मानवतेचें
तांडव चाले क्रुद्ध भुकेचें
आर्त जिवांना हात झणीं दे त्यांत तुझा उद्धार

निर्वाणीचा येत सख्या, क्षण
तुष्ट करी हा रुष्ट जनार्दन
मंगल त्या वरदानें होइल जीवन सालंकार ?

# गोड सोबत

( छंद - परिलीना )

सोबत ही गोड लाभली मला
सखे, तुझ्या छन्दें जीव रंगला

पाजळली तुवा अढळ ज्योती
मनीं खूणगांठ आहे दृढ ती

पाहे डोकावुनी पहाटतारा
घेत ललकारी मंजुळ वारा

विहरे मी स्वैर नदीकिनारीं
मुग्ध शैशवाची भरे माधुरी

गर्द आंबराई डोले हासरी
साजे हिरवा तो स्वर्ग भूवरी

मिळे प्रेमळ ही मैत्रीण तेथे
जुळे पुन्हा पूर्वजन्मींचें नातें !

शाप नियतीचा बाधला परी
दुरावे सुखाची ठेव ती खरी

सान पाखराला नुरे आसरा
दाटे सभोंवती अंधार सारा

कासावीस प्राण झाले त्यावेळीं
आलीस तूं विजेपरी जवळी

फिरतां अंगुली तुझी जादूची
ढळे तटबंदी दुःख-भयाची

काळ्या क्षितीजाची कडा उजळे
निळ्या नभांतुनी सोनें निथळे

तुझ्या सुहास्याचा सुगंध मंद
पिकवी जीवनीं माझ्या आनंद

खुले किती छान सावळी छबी !
जणूं कल्पलता सजीव उभी

रेशमी नव्हाळी रेखीव गात्रीं
शीतळ चंद्रिका बिंबली नेत्रीं

मुखीं कमलांची कांती कोवळी
चिरसौंदर्याची शोभे पुतळी

वेड दुजें परी यौवनीं जडे !
दुर्लक्षुनी तुला धाव घे पुढें

प्याया मृगजळा श्रांतलों वृथा
आर्त साद माझा तदा ऐकितां

दाटुनी ये तुझा ऊर साजणी !
धीर मला देशी सुधावचनीं

तुझ्या नजरेची गहिरी माया
खेळवीत झरे वाळूरणीं या

रवितापें तीव्र होतां काहिली
घातलीस शिरीं गार सावली

प्रीतीच्या सिंचनें वैराण पथीं
निर्मिली त्वां नवी फुलबाग ती

ओलांडतां कडे तुझ्या संगतीं
अंगीं प्रहारांचीं भूषणें होतीं

जाणुनी औदार्य तुझें थोर तें
भारावे मन हें प्रिये कविते !

रम्य भविष्याची गुंफीत माला
राहे अखंड हा स्नेह आपुला !

# विस्मृता

( मुक्त छंद )

हृदय माझें कढतें
अनिवार दु:खानें कसें
तें उकलुनी दाखवूं मी कुणाला ?
भूल निशेची भोंवती पसरे
शांत झोपली अयोध्या नगरी
शून्य महालाच्या स्मशानांत या
एकली मी जागे भुतापरी !
तिमिराची पिऊनी मदिरा
भयाण बागेंतुनी बरळे वारा
निर्जन पुढला राजमार्ग हा
अजस्र अजगर सुस्त जसा पडला
कृष्णपटीं मुख झाकुनी भूबाला स्फुंदते
गगनाच्या गवाक्षामधुनी
डोळे मिचकावुनी पुन्हा
तिला हिणविती विलासी देवांगना

प्रिय माझ्या सख्या लक्ष्मणा !
विरहानें तव होउनी वेडी
आठवते मी घडिघडी तुजला
रघुनाथासवें वनास जातांना

घेतलीस नच तूं अनुज्ञा माझी
वळुनी मागें हळुच एकदा तरी
पाहशील हसऱ्या वदनीं
कितिदा मी लगबग आलें दारीं !
गोड तुझा तो शब्द झेलाया
श्रवणांची ओंजळ करुनी
धडधडत्या उरीं सरलें पुढें
पण हाय, तुला न कळला माझा हुंदका !
कठोर कसा झालास इतुका
प्रेमळ माझ्या प्राणेश्वरा !
वल्कलधारी तुझी पाठमोरी आकृती
न्याहळीत पाझरत्या नेत्रांनीं
अंगणांत मी थिजुनी होते उभी

धरिला त्वां मजशीं अबोला
काय असा मी केला गुन्हा
म्हणुनी येत कपाळीं भीषण शिक्षा
केलीस हीच कां माझी प्रेमपरीक्षा ?
तरुणपणीं ऐन मला
तुंवा सक्तीचा संन्यास दिला
फुलत्या आशेवरी माझ्या प्रियकरा !
ठेविलास तूं स्वकरीं निखारा

वैधव्याहुनी अहेवपण हें असह्य भासे !
मानुनी जिवाचा धनी ज्याला
जीवनसर्वस्व आनंदें अर्पिलें
त्या मुग्ध सखीचा तिच्या वल्लभानें
अव्हेर करावा निर्दयपणें
यापरतें दुर्भाग्य तें कोणतें !

थोर तुझी ती बंधुप्रीती
उज्ज्वल ध्येयनिष्ठा तशी धीरता
आदर्श चारित्र्य तुझें सकलांना
असा गुणी तेजस्वी सहचर लाभला
मजला किती वाटली धन्यता !
गमे विस्मय कीं, तुला परी त्या
जाणीव न व्हावी पतिधर्माची !
विवाह समयींचीं पवित्र तीं वचनें
विरघळलीं तव स्मृतिपटलावरलीं
हें शल्य जिव्हारीं सारखें सलतें
विस्मरण तुला मम झालें
त्याक्षणीं मरण खरें मज आलें !
वंचनेच्या धगधगत्या चितेवरी
रात्रंदिन जळत राहे
ही तुझी लाडकी उर्मिला !

तुझ्यासंगें दारुण वनवासही
खचित मजसी स्वर्गतुल्य होता !
मृग–विहंगांच्या बघत मनोहर लीला
चपळ निर्झरांची ऐकत झुळझुळ गाणीं
चाखिलीं असतीं आवडीनें मी कंदमुळें
गर्द तरूंची शिरीं छाया
तृणाची शय्या, फत्तराची उशी
तुझ्या स्नेहाची सुखद तशी चंद्रिका
देती नवा गोडवा गुपितांना !
पतिदेवाच्या पदकमलांची सेवा
हाच सतीचा अक्षय भाग्यनिधी
अंतराला तो या अभागिनीला !
तुझी थोरवी गातां जग रंगलें
त्याला न माझ्या त्यागाची कल्पना
तेजांत रवीच्या निमाली चांदणी !
मातीमोल झाले माझे भावमणी
मूकपणें भोगणें ही घोर उपेक्षा
न्याय कोण देणार मला ?

# दूरचा डोंगर

(सुनीत)

आशेची फुलवीत बाग हसरी आली उषा भूवरी
वाजे मंजुळ बांसरी सहज ती मोही जिवा माधुरी
कांती सुंदर सान थोर अवघ्या वस्तूंप्रती लाभली
सामोरीं मधुराकृती जणुं उभी सुस्वागता राहिली

जातां सन्निध हेमराशि दिसली काळी शिळा मात्र ती!
गेलीं दिव्य फुलें कुठे, विखुरले काटेकुटे भोंवती
ते साधे दंवबिंदु जे प्रथम कीं मोती खरे वाटले
सृष्टीची नव चारुता रुचिर त्या गीतासवें मावळे

भासे श्याम गिरी सुरम्य दुरुनी तेवी असे जीवन
सोनेरी वरचें धुकें वितळतां ओलावती लोचन
प्रीतीचें गगनीं विमान चढतां खालीं क्षणीं कोसळे
हासे निष्ठुर दैव, केवि पुढती ठाके नको तें बळें !

स्वप्नाळू मन गोंधळे गिरवितां वस्तुस्थितीचा धडा
देई जाणिव काळ ओढुनि परी पाठीवरी कोरडा !

# धरित्रीचा धनी

(सुनीत)

धीरें ओढित नांगरास ढवळी ती बैलजोडी पहा !
राबे मैतर सावळा तिजसवें, तापे नभीं सूर्य हा
फाळानें वर मृत्तिका उसळते फेसाळ लाटेपरी
झेलाया टपले अबोल बगळे त्या कीटकां सत्वरीं

घेतीं स्तब्ध वनें उन्हांत डुलकी, ओहोळ हासे निळा
ऐटीनें जुळवीत पंख हिरव्या निंबावरी कावळा
जातीं नाचत उंच वावटळीनें तीं शुष्कपर्णे कशी
स्वप्नें रम्य भरारतीं क्षणभरीं कीं निर्धनांचीं जशी !

सोनेरी उधळीत अमृतसरी संध्या खुले लाजरी
मोही तोरण सप्तवर्ण नयनां, शांती भरे अन्तरीं
ओलेतीं वनसुंदरी विलसतां दावी सुगंधी स्मिता
संसारीं पिकवी अवीट सुख ही कष्टांतली दिव्यता !

शोभे शेतकरी धराधिप खरा जो पोषितो जीवनें
शाहाणी दुनिया तया हिणवुनी केवी अडाणी म्हणे !

# स्वप्नपक्षी

(छंद-षोडशाक्षरी)

आकाशाच्या कडेवरी चंद्र शोभला पिवळा
नक्षत्रांचे लक्ष तुरे अंकुरती अंधाराला
घाली सुगंधाचे सडे अंगणांत रातराणी
श्रांत जगाला गोंजारी शांती रुपेरी करांनीं

सले कांहीतरी उरीं एकला मी घरीं जागे
मंद शीळ घुमे कानीं डोकावुनी दारीं बघे
गौर मूर्ती चंद्रिकेची मला पालवी हासुनी
गूज तिचें जाणाया मी निघे बाहेरीं त्याक्षणीं

अंथरला पृथ्वीवरी गालिचा कीं मोगरीचा
थाट अपूर्व कलेचा दावी चितारी सृष्टीचा
संथ वाऱ्यासवें रानीं खेळे गारवा रेशमी
मुग्ध विलासीं रंगली चित्तहारी चैत्रलक्ष्मी

पर्णांतुनी हळुवार झरे कोवळें चांदणें
मूकतेच्या कोषांतलें खुले प्रतिभेचें लेणें
यक्षकन्या छायापटीं किती छान रेखी नक्षी
रजनीच्या निळ्या कुंजीं गात नाचे स्वप्नपक्षी !

देह सुकुमार त्याचा गमे चमेलीचा झेला
घोस द्राक्षांचा रसाळ कंठीं सुरेल पिकला
जडे सोनेरी झळाळी चंदेरी त्या पिसाऱ्याला
शारदेचा मंजुवीणा काय झंकारीत आला ?

विलोकुनी त्याला क्षणीं सुटे खिन्नतेची मिठी
नटे दिव्यता भोंवती निवे भारावली दिठी
खेळगडी तो लाडका फार दिसांनीं भेटला
आसवांचे झाले मोती, वाढे गोडवा पहिला

बाल्यापासुनी अन्तरीं छंद लागे सदा त्याचा
विरे भान चाखितांना गोड चारा लकेरींचा
तीव्र झळांनीं त्या जरी भावफुलें कोमेजलीं
मोहरती पुन्हा नेत्रीं रम्य किती स्वप्नवेली!

दुर्लभ या लोकीं भासे यशोधनाची वानगी
मला निसर्गराजाच्या मिळे प्रेमाची देणगी
घायाळलों झेलतां मी घाव जीवनाच्या रणीं
स्वर्गीय ती ज्योती परी देत जीवा संजीवनी !

गरीबांना जगण्याची होत जणूं जगीं चोरी
रसिकांची आपुलकी मला अंतरली तरी

दिशा वादळीं दर्शवी अक्षय तो आशातारा
धीर नवा लाभे मना दूर गांठाया किनारा

वनदेवा, तुझी जादू सुधा करीत विषाची
आकारुनी ये भूतलीं अिंद्रसभा सौंदर्याची
तुझ्या संगती मी सुखी तूंचि धनी बोलविता
करूं चिंता कशाला, ही कोण वाचील कविता ?

# नवा किनारा

( जाति · लवंगलता )

नाव लोटली जळीं अेकदा बेत आपुला ठरला
नीट सुकाणू धरी साजणा, भिरभिर वारा सुटला
बघसी मागें काय पुन्हा तूं ? विस्मय मजला वाटे
जुन्या जगाचा निरोप घेतां कंठ तुझा कीं दाटे

म्हणालास तूं मला प्रीतिनें गळां घालुनी बाहू
" दोघें मिळुनी दूर जाऊनी स्वप्न मनींचें पाहूं
नको लोळणें कर्दमांत या, मृत्युहि तो परवडला "
ध्रुवतारा तव निर्धाराचा अितुक्यांतचि का ढळला !

गणगोतांची त्यजुनी माया तुजसाठीं मी आलें
ती कां जाया परत घरासी घेउनि मुख हें काळें ?
जागुनि वचना फेक झणीं हा बुरखा भ्याडपणाचा
भवितव्याचें कवाड फोडूं हाणुनि घण यत्नाचा

"स्त्री अबला, ती पुरुषाच्या जणुं होते चरणीं बेडी"
कृतिनें दाविन अेसे किती ही लोककल्पना वेडी
वाळूमधल्या चिमण्या कोटीं रमण्याचा दिन गेला
कुंपांतिल सरडयापरि आपण जन्मलों न जगण्याला !

त्याली कधि का दुबळी आशा दिव्य यशाचा शेला
गृहशूराला नच तो पचतो प्रीतीचा मधुप्याला
परिस्थितीची छळिते कृत्या क्रांतिप्रिय व्यक्तीला
बलिदानाच्या सोपानें ती चढते अमरपदाला

अग्निदिव्य हें जीवन आहे, शब्द उरीं हे कोरी
ध्येयंनिष्ठ मन देत न चालूं काळाची शिरजोरी
पराजयाच्या भयें जपावी कशास नश्वर काया ?
भासे त्याहुनि बरवी शीतळ जलधितळींची शय्या !

घेणार न माघार अतां मी तुजहि न देऊी परतूं
लंघुनि धीरें तट रूढीचा पूर्ण करूं निजहेतू
निर्भय आहों नाविक आम्ही जन्माचे सहकारी
नवक्षितिजाचीं निर्मित वलयें घुमवूं साहस-भेरी

प्रलय घनांची प्रमत्त सेना खिदळत नाचे गगनीं
काजळले गिरि धुंद दिशांच्या जहरी फूत्कारांनीं
वदनदरी तिमिरासुर पसरी, बावरुनी रवि जाऊी
घोर निशा ही असे उद्याच्या रम्य उषेची आऊी !

चल सांगूं या क्षुब्ध सागरा, "खुशाल घाली धिंगा
तव छातीवरि पाय देऊनी गांठूं वांछित जागा

कोटि जिभांनीं गर्जत उसळो वडवानल गर्वाचा
तुला अगस्ती शोषिल अमुच्या दुर्दम आकांक्षेचा "

गरुडाच्या अवसानें हासे शीड उंच माडांना
" अखंड झुंजत पुढती जाणें "--हाच आपुला बाणा
सहकार्यानें घडवुनि तोरण सुंदर संसाराचें
फडकत ठेवूं अखंड जगतीं निशाण मानवतेचें

विशाल काळा चक्रव्यूह हा स्फूर्तिबळें भेदावा
सफल नसे जों ध्यास जिवाचा तों न विसांवा ठावा
मधें कदाचित फुटे भयानक तुफानांत नौका ही
खचेल अवचित जीवितदोरी तरी न चिंता कांही !

पैलकिनारीं नेतिल लाटा मिरवित अपुलीं प्रेतें
भाट नव्या अरुणाचे झुलती जयजयकारीं तेथे
वर्षतील वनलता फुलें त्या जुळ्या समाधीवरती
नम्र तिजपुढे होतिल भावी जळवीरांचीं माथीं !

# काळे मोती

( मुक्त छंद )

सावळी ही मृत्तिका
पहा, कशी पहुडे मूकपणें
मत्त आपुलीं नरा, पाउलें
तूं टाक जरा जपुनी !
खेळकर कलाचतुर सृष्टिवधूनें
गुंफिला हा मोहक मखमाली गालिचा
स्निग्ध उटी आपुल्या मधुस्मितांची
आनंदी फुलवंतीनें दिली त्याला
डोकावती हळू त्यामधुनी वरती
सौंदर्याचे नवलाख रत्नतुरे कोवळे
वत्सल या भूमातेच्या पदराखालीं
गोड उद्याचें गोकुळ तें
देत हुंकार डोलत राहे
विहरे त्या भंवती गात अंगाओ
नाजूक नाचरी नवतीची माया

क्षुद्र जरी दिसती धूलीचे हे रेणू
तूं जाणुनी घे त्यांची महती !

चिमण्या त्यांच्या मुठींत सामावलीं
कोटी कुबेरांचीं विशाल कोषागारें
मिटलेल्या पापण्यांत त्या उमलती
सुखी संसाराच्या सुरम्य स्वप्नकळया
अिवल्याशा ओठीं धुमते विश्ववीणा
मंद तयाच्या निःश्वसनीं स्रवते
मधुर सुगंधाची अखंड मंदाकिनी.
अवमानिसी मीपणें जरी त्या सान कणांना
क्षणीं त्यांतुनी प्रगटती भीषण नागफणा
चहूबाजूला लखलखतां वज्राचीं पातीं
संहारक रुद्राच्या धगधगती ज्वाला
आजवरी दग्ध ज्यांनीं केले किती
महदाकांक्षी मदांध रावण हिटलर ते !
सावध होउनी वेडया, झणीं
तूं करी आदरें त्यांना मुजरा !

श्रमिकांचे निर्मळ स्वेदबिंदू
सतीचे अश्रू , गहिवर संतांचे
तेवी हुतात्म्यांची पावन रुधिरधारा
संतत पाझरुनी ही माती
अवध्या पुण्यक्षेत्रांचीं बनली राणी !

शतकांच्या कलहांचें कालकूट तें
हसत मुखानें प्राशुनी आणि तसे
प्रलयाचे अशनीपात शिरीं वर्षतां
भरत्या माणुसकीला जगतीं
घेउनी उराशीं तिनें जगविलें आहे !
व्यास वाल्मिकी, कालिदास ज्ञानेश्वर
राम कृष्ण, ख्रिस्त बुद्ध, गांधी
तो मार्क्स तुझा फ्राईडही त्यापरी
थोर युगंधर, शूर शिलेदार क्रांतीचे
समतेचे पुजारी, दलितांचे कैवारी
हे सारे या मातीचेच होते मुलगे !

घोर तुझे अपराध घालुनी पोटीं
जिनें तुला अमृतपान्हा दिला
त्या पुण्यशील करुणामूर्ती धरित्रीला
जड, नश्वर, हीन मानुनी हिणविसी
अज्ञान तुझें हें केवढें पंडिता !
स्वर्ग, नरक, मोक्षही तो वसे येथे
मातीच्या उदरामधुनी
प्रगटे सोन्याची द्वारका
अंकीं तिच्या खेळतो परमात्मा
पार्थिवता ही दिव्यतेची जननी !

ग्रंथ संग्रहालय

या चिखलाचा लाव कपाळीं टिळा
होईल तुझ्यांतील ‘ खरा मानव ’ जागा !
संकुचित वृत्तींचीं लोपुनी कुंपणें
विस्तारेल कक्षा तव कर्तृत्वाची
तेजाळतां आशादीप अन्तरीं
घुमवीत नव्या मनूची तुतारी
उभवाया पताका मानवतेची
लाभेल तुला निरंतर स्फूर्ती
जीवनाला चिरसौभाग्याची सुंदर माला
अर्पिती हे साधे काळे मोती !

## कावळा

( जाति-सूर्यकांत )

डौलदार हा गर्द सावळा निंब डुले अंगणीं
शुभ्र तुऱ्यांचा दरवळ पसरे शीतळ वाऱ्यांतुनी
गात सुखानें बसे डवरल्या फांदीवरि कावळा
गमला शालिग्राम जणूं कीं हिरव्या मखरांतला
तिनिसांजेच्या खुलतां नाजुक हास्यकळ्या भूतलीं
वनगवई तो घुमवी सनई श्यामल कंठांतली
लांब निमुळती चोंच पुन्हा ती मुरकत सरसावुनी
उजळित काळेनिळे पंख तो रमला पिवळ्या उन्हीं
मखमाली महिरपींत लटके घर काडयांचें कसें !
पांढरपेशा संसाराचें चित्र रेखिलें जसें
उंबरठयावर निळ्या लाजरी चाहुल घे चांदणी
आतुरला तो, अजुनी आली नाही का साजणी ?

काणा डोळा वर्णहि काळा, कर्कश त्याचा गळा
त्यास घडवितां विधि केवळ कीं वापरीत काजळा
गुलाबवेडया रसिका 'काळा झेंडू' हा नावडे
न करी याची खंत कधी तो स्वच्छंदें बागडे
पाहुनि त्याला पटतें, 'लहरी निसर्गराजा असे'
कोळशांतल्या माणिकास का अवचित फुटलीं पिसें !
हालचाल किति मोहक त्याची मला गुंगवी परी

बाळपणीं त्या रम्य तयाशीं दाट जुळे मैतरी
उभी राहुनी दारीं आई, "ये ये काऊ" वदे
कडेवरी मज मिरवित लाडें मधुर मुखीं घास दे
सुचवी त्याची रुक्ष गिरा, ये 'गोड पाहुणा' घरीं
हृदयसंपुटीं मधुस्मृतीची परिमळली कस्तुरी

तारुण्याच्या फुलबागेचें बाभुळवन होऊनी
गुलहौशी त्या राघूमैना गेल्या कोठे झणीं ?
वैफल्याच्या हिमें प्रीतिचें कमल सुके कोवळें
होत रिकामे मधुघट, खचले पत्त्यांचे बंगले
गात विराणी शुष्क जीवनीं हृदयाची कोकिळा
कोंभ कलेचा खुडुनी टाकी पोटांतिल कावळा
गतस्वप्नांचीं उबवित अन्डीं वेडी आशा झुरे
पाडुनि पैलू गारांचे परि कोठुनि बनती हिरे ?
भोळी गरिबी सोजन्याचा लावुनि भाळीं टिळा
अश्रुजळें शमवाया सजली भीषण दावानला
नवकाळाचीं वाघनखें तीं जीव वधे संभ्रमें
कृष्णपक्षि हा प्रतीक नीरस वास्तवतेचें गमे !
माखुनि उसना रंग पांढरा धूर्त कावळे किती
घेत आपणां हंस म्हणवुनी डौलानें मिरविती
बहिरंगाला भाळुनि जग हें गौरव त्यांचा करी
मात्र खऱ्या हंसाला मिळते तिमिराची ओवरी !

# नटराज

( छंद–जीवनलहरी )

तांडव करी हा नटराज कसा !
गर्जत ये पुढे ज्वालामुखी जसा
मुक्त जटाभार रक्तटिळा माथां
आपटी त्रिशूळ विकट हासतां
ताणुनी भ्रुवनू नेत्र विस्फारले
लाल ओठीं जिव्हा विजेपरी लोळे
रुळे रक्ताळली रुंडमाला गळां
काढी फूत्कार तो क्रुद्ध सर्प काळा
आर्द्र व्याघ्रांबर वेढिलें कटीला
स्वर्णघंटिकांची निनादे मेखला
भव्य गौर देह क्रोधानें डवरे
शुभ्र हिमाद्रि कीं माखला शेंदुरें

करी सिंहनाद भुजा थोपटूनी
सुटे झंझावात उष्ण श्वासांतुनी
ओसंडे आवेश विक्राळ वदनीं
धडाडे कपालकुंडांतला वन्ही
शिंग फुंकी बळें धुंद पदन्यासें
दणाणती दिशा डमरूच्या घोषें

उफाळती ज्वाला घुसळितां अंग
प्रलय मेघांचे घुमती मृदंग
धरी गण फेरा भीषण भोंवती
छेडी रुद्रवीणा सोत्कंठ पार्वती
भीमबाहूंनीं तो वेढी भूमिनभा
उग्र दंष्ट्रांची त्या लखलखे प्रभा

भेदुनी पर्वतां क्षोभवी सागरां
कांपवी नर्तनीं विश्वगोल सारा
पाडीत भूवरी नक्षत्रांचा सडा
फोडी शतकोटी रुधिराचा घडा
गांजितीं दुष्ट जीं स्वार्थभूतें दीनां
रगडी रुद्र हा पायातळीं त्यांना
झोंबती सतींना दूत सैतानाचे
छेदी परशूनें कंठनाळ त्यांचे
खिदळती मत्त जेते सिंहासनीं
वज्रमुष्टीनें त्यां करी चूर्ण क्षणीं
सत्तावेडे, रूढिदास, पुंजीपती
शोधुनी तयां ती वधी काळमूर्ती

जागे व्हा जितांनो, भाग्यकाल आला
तुटे शतकांची दारूण शृंखला

क्रांतिदेव शोभे रंजल्याचा सखा
बोला जय मुखें, उभारा पताका
उजळी जाळुनी गंजल्या जगाला
मृत्युंजय उभा साधाया मंगला
कोसळोनी कोट जीर्ण संकेतांचा
वाहे शुद्ध पुन्हा ओघ जीवनाचा
साकार सुरम्य स्वप्न तें युगांचें
झालें बलिदान सार्थ पुण्यात्म्यांचें
रौद्रता गमे ही रम्यतेची माता !
लेणें सौभाग्याचें ल्याली मानवता
करी शिव कायाकल्प या सृष्टीचा
संहारांत मांड नव्या संसाराचा !

# तेजोबाण

(जाति-पादाकुलक)

पाश झुगारुनि कृष्णनिशेचा
उसळे वरती शर तेजाचा
उदयगिरीच्या किरिटामधला
कोहिनूर तो सुंदर गमला
नीरवतेच्या नील जलावर
लहरे जणुं हें कुमुद मनोहर
पूर्वदिशेच्या उंच गोपुरीं
उजळी दीपक उषा लाजरी
फडकावित ही स्फूर्तिपताका
उतरे भूवरी देवदूत का !
घुमवित भंवती जागृतिचे स्वर
प्रकाशखग हा विहरे झरझर

दिव्य गिरा ती रिघतां श्रवणीं
पुलकित झाली श्यामल धरणी
नवकिरणांची लागुनि चाहुल
घनतिमिराचा वितळे बागुल
खुलती आशामोती नयनीं
फुलराणी हो दंग नर्तनीं

स्वातीचा मेघ

भूपाळी तरुमाला गाती
सोनेरी स्मित पसरी शांती
विषण्णतेचा सुटुनी विळखा
पालवते झणिं जीवनलतिका
कुरवाळित या स्थिरचर जगता
झुळझुळ वाहे कांचनसरिता

शांत सुरंजित प्रभातकालीं
गंधसडे मंदानिल घाली
जुळती कर ते स्वर्गधरेचे
प्रत्यंतर ये दिव्यत्वाचें
वास्तवतेच्या रुक्ष पटाला
सौंदर्याचा चढतो उजळा
मानवतेच्या मांगल्याचें
स्वप्न होत साकार युगांचें
गुंफित सूक्तें शुभ दिवसाचीं
विलसे लक्ष्मी स्वातंत्र्याची
होउनि जागें विश्वहि अवघें
क्रान्तीच्या जयघोषीं रंगे !

प्रिय शुक्रा, तव मूर्ती हसरी
फुलवी अक्षय ज्योत अन्तरीं

शरदाच्या तूं सुखसहवासी
सृष्टिवधूचें कोड पुरविसी
आठवती मज दिन बाल्याचे
मधुकलिकांच्या मृदु गालींचें
घेत गुलाबी दंव चुंबुनि तें
रानपऱ्यांचीं ऐकत गुपितें
निरखी मी तव अद्भुत किमया
प्रीति मला ती रमवी सखया !
लोपुनि जडता प्रौढवयाची
सुटतीं कोडीं मूक जिवाचीं !

# पहिला क्षण

( सुनीत )

भेटीच्या पहिल्या क्षणांतिल असे अद्यापि तो गोडवा
दोघांच्याहि मना करी गुदगुल्या जादू नवी तेधवा
लाजाळू नजरा हळूच मिळतां मैत्री जुळे आपुली
सोनेरी किरणांत दोन सुमनें आंदोलतां रंगलीं

सांगे शीतळ सावलींत गुपितें बागेंतला चौथरा
कारंजा उधळी तुषार हसरा डोले कसा मोगरा !
आशा घालुनि रेशमी कर गळां रेखी सुखस्वप्न तें
लोकीं जें मनुजा गमे प्रिय तया कां दैव नाकारितें ?

झालों व्याकुळ वाळवंट पुढलें ओलांडतां एकला
लाभे शांति जिवा निवांत वळतां त्या ओळखीच्या स्थळा
चाले गर्जत काळलाट पुढती, झाले दुवे वेगळे
प्रीतीचें रमणीय चित्र परि तें नेत्रांतुनी ना ढळे !

येशी आज अशी अचानक सखे, भेटावया तूं मला
वाटे भाग्य मदन्तरीं तरि कशी माझी म्हणूं मी तुला !

# रणांगणावर

( सुनीत )

“नाही भाग्य पहावया विजय हा”–घायाळ बोले रणीं
“देवा, ही प्रिय मायभूमि जगतीं ठेवा सुखी रक्षुनी
अंधेरी नयनीं भरे, बधिरता आली तनूला क्षणीं
चित्रें तीं स्मृतिचीं सुखप्रद किती साकार झालीं मनीं

“साजे सुंदर गांव निर्झरतटीं ती बालसेना जमे
तेथें दिव्य सुखांत जीव रमतां कानीं तुतारी घुमे
उत्साहें निघतां रणा अडवुनी स्फुंदे सखी प्रेमला
धीरें शांतविलें तिला पण गळा माझाच कीं दाटला”!

स्वातंत्र्यास्तव वीर तो झगडतां घायाळला संगरीं
तेजानें परि त्याचिया प्रखर त्या वैरी थिजे अन्तरीं
वाऱ्याचा हळुवार हात फिरतां रक्ताळ गात्रांवरी
स्फूर्तीच्या उधळीत दिव्य लहरी दाही दिशा शर्वरी

डोकावे हसरी पहाट गगनीं माला करीं घेउनी
क्रांतीचा जयनाद मंद उमटे त्या बंद ओठांतुनी !

# अेकान्तींचा मेवा

( छंद–परिलीना )

खेळे माळावरी प्रकाश मंद
मध्यभागीं उभी टेकडी स्तब्ध
गर्द आम्रवृक्ष तेथे वाढला
देत सोबतीचें सौभाग्य तिला
स्वर्णशलाकांनीं संध्यासुंदरी
सावळी तयाची काया शृंगारी
छान पुष्पवेला वसंत–सखी
ठेवी सजवूनी मेजावरी कीं
मूक धरित्रीच्या कर्णपुटीं तीं
ओणवुनी तृणें काय सांगतीं ?

भरे नजरेंत निवांत जागा
नाज़ूक मैत्रीचा जुळवी धागा
भारावल्या मना शिलासन तें
विसाव्याचें गोड भातुकें देतें
रेलुनी त्यावरी मोकळ्या अंगें
रम्य सृष्टीच्या मी दर्शनीं रंगे
घाली पाचूझगा निंब गहिरा
उभारी पांगारा लाल पिसारा

शिरीं वट बांधी भगवा फेटा
पिंजारीत माड पिंगट जटा

सूर्याच्या रथाची ध्वजा केशरी
झळके धूसर क्षितीजावरी
कुंकुमाचा टिळा चढे गोपुरां
घरट्याचा लळा जडे पाखरां
भव्य गगनाच्या पार्श्वभूमीनें
खुलतीं श्यामल पर्वत-रानें
जड पाउलीं घे चाहुली वारा
शोधी प्रवासी तो काय बिचारा ?
स्तब्धतेची भूल दाटे भोंवती
विश्वयंत्राची त्या मंदावे गती

घेत मुखावरी बुरखा निळा
पलीकडे गांव स्वस्थ ठाकला
आईच्या कुशींत फुलें झोपलीं
चाले पाकोळ्यांची फेरी वाटोळीं
मंजु घंटानाद घुमे राउळीं
भाविक पिंगळ वाजवी टाळी
समतेची द्वाही फिरवी निशा
ज्वाला कलहाच्या निवाल्या तशा

आकाशगंगेच्या प्रशांत तीरा
निघाल्या अप्सरा जलविहारा

मेघपटलाचें काजळ डोळां
घालुनी न्याहळी पूर्वा कुणाला ?
फुलतां मोगरा ओठीं स्मिताचा
आला राजहंस लाडका तिचा
रंगली अन्तरीं रजनीबाळी
ओंजळी मोत्यांच्या नभीं उधळी
मोहरे शांतीचा चंदेरी मळा
झुले सावल्यांचा लाजरा मेळा
दुग्धधारांनीं त्या स्वर्गींच्या धेनू
स्नान भूदेवीला घालिती जणूं !

विराजे हासरी निसर्गवधू
मुग्ध सौंदर्याची लहरे जादू
तेजाळे त्याक्षणीं जीवनज्योती
खिन्नतेचीं काळीं पुटें लोपतीं
झंकार ये कानीं दिव्य वीणेचा
मंजुळ पैंजण बोले प्रीतीचा
प्रिय स्वप्नांची ती राणी भेटली
काव्यांतली गोडी साकार झाली

स्निग्ध एकान्तींचा चाखतां मेवा
पंख नवे पुन्हा फुटती जीवा !

# का लिहितो मी कविता !

( जाति-अंजनी )

उकलेना तें गूढ मला, का लिहितो मी कविता !

मधुस्वप्नांची उधळित माला
मुग्ध उषेच्या चुंबुनि गाला
स्वर्णकरांनीं अरुण जागवी निद्राकुल जगता

सृष्टिवधू कशि खुले वसन्तीं
भुलवित जादू कोकिळेस ती
आवरेन तिज कंठांतिल तो कारंजा झुलता

"ही नवकलिका नटली रसिका !
करि गुंजन तूं" कोण वदे कां !
सहजगुणें तरु विजनीं सुखवी गहिवरल्या पांथा

पारिजात फुलवीत नभींचा
हरी चंद्रिका दाह जिवांचा
दिव्य कलेनें रुक्ष जीवना जडवी सुंदरता

निमग्न कलहीं अजाण बाळें
शतवणव्यांनीं तनु जरि पोळे
वितरी नूतन रत्ननिधी तरि वत्सल भूमाता

संसाराच्या रजतपटावर
विविध नाचती आकृति सुंदर
सुखदु:खाचे विणती धागे वेधक भावकथा

वास्तवतेच्या वाळुरणांतुनि
कांचनकण ते घेत वेचुनी
आनंदाचे गुप्त झरे मज अमृत चाखवितां

माती मधुनी पिकवित मोती
वाहे पावन श्रमधारा ती
नमवी शिर त्या खाणमळ्यांतिल श्यामल भगवंता !

म्लान मुखें हीं असंख्य भंवती
पाहुनि माझे डोळे भिजती
त्यांतुनि हृदयीं माणुसकीचा मोहर दरवळतां

होत पारखी प्रीती सुखदा
पाठ फिरविती कीर्ति-संपदा
मृदुवचनीं परि मला सावरी प्रिय आशा दयिता

संतत चाले संगर दारुण
स्फूर्तीचे स्वर घुमवी कविमन
हारजीत नच गणितां धीरें अनुसरतें स्वपथा !

# राजघाट

( जाति भूपति )

जनकल्याणा जो केवळ बनला जोगी
प्रिय ध्येयाकरिता खडतर कष्टहि भोगी
नाज़ूक हासरें फूलच प्राजक्ताचें
त्या प्रशांत वदनीं दिसे प्रफुल्ल सदाचें

या हरित तटाकीं ठाके धवल समाधी
गहिवरुनी अर्पी अर्घ्य पदीं कालिंदी
तो संत अहिंसावादी चिरविश्रांती
घे येथे, नत हो काळपुरुष त्यापुढती

रवि सांजसकाळीं कांचनसुमनें उधळी
तरुराजी चवऱ्या लालकेशरी ढाळी
सुस्वरें तया किति आळवितां खगमाला
पंचारति सादर ओवाळति सुरबाला

जो वीरपुत्र या मायभूमिचा प्यारा
घनतिमिरांतुनि सरसावे मोहन तारा
पाहुनि अन्तरीं लोक तृषाकुल सारा
ये करुणाघन तो वर्षत शीतळ धारा

श्रद्धेचा गाभा, सागर सामर्थ्याचा
जयघोष दिगंतीं गर्जत मानवतेचा

क्रांतीचा पूजक, पददलितांचा नेता
हा विश्वप्रेमी भारतभाग्यविधाता !

क्रिति शांत निरागस मूर्ती भेदाया ती
तव हात अभागी नरा, कसा हो वरती ?
ही धरिती पावन रुधिरें जाय भिजून
कीं दुनियेंतिल हा माणुसकीचा खून !

" करि क्षमा अज्ञ या जिवांस भगवंता, " ही
गंभीर गिरा दे महात्मतेची ग्वाही
हिंसेनें न कधी सत्य मरे अविनाशी !
पुण्यात्मा पटवी दृढ हें तत्व जगासी
आनंदें स्वतनू वेचुनि जगदुद्धारा
जणुं शांतिदूत हा शोभे दधिची दुसरा
तन्मरणीं जागे अक्षय जीवनज्योति
ती भावि पिढयांना अखंड वितरी स्फूर्ती

तो विमल यशोध्वज राजघाट हा उभवी
मिरवीत अकला ' तीर्थराव ' ही पदवी
त्रिभुवनांत मंगल, रम्य भव्य जें आहे
माहेर मनोहर त्या अवघ्यांचें स्थळ हें !

# सुरवंट

( मुक्तछंद )

कळाहीन ही पाहुनी माझी काया
लोटुनी दिलें जगानें दूर मला
सलती जहरी बाण ते उरीं
मी दोष परी केवी देऊं जना !
अमंगलाचा आवडे संग कुणा ?
खंत वाटे मला माझ्या कुरूपतेची
उपाय परंतु त्याला नव्हता माझा
काय करूं मी, सुचेना कांही
'लांछन हें ललाटींचें लोपेल कधीं' ?
ही एकचि चिंता जाळी जिवाला
अपराध तरी काय देवा, घडला
म्हणुनी त्वां दीन असें मज केलें ?

अंधाऱ्या कोनीं काळें मुख झाकुनी
नियतीची दारुण शिक्षा भोगितां
ढाळीत आसवें राहिलों एकला मी
दंग दिसे आनंदीं अवघी दुनिया
बंद मात्र सुखाचें दार मला !
आढळेना कुठेंही किरण आशेचा
सांगूं कुणाला अन्तरींच्या कळा !

कसा करंटा जन्मलों मी !
वीट मला जगण्याचा आला
या जितेपणींच्या घोर मरणयातना
कुठवरी मी सोसूं तरी !
वेढी नयनां घनदाट अंधार
सुंदर मी कधी अन् कसा होणार ?
तळमळतां मी निराशेच्या भीषण कारागृहीं
सोनेरी ज्योतीपरी झळकत नाचरी
हासत आली रानपरी मजपाशीं
कुरवाळुनी सुकुमार करांनीं मला
मधुर वाणीनें ती म्हणाली—

" झुरूं नको मनीं वृथा
नको हीन लेखूं स्वताला !
पहा रुक्ष पाषाणाच्या पोटीं
पाझरे अमृताची गोड धारा
काळ्या रात्रीच्या मळक्या पदरांतुनी
प्रकाशाचें मोहनरत्न तें लकाके
कुटिल कंटकांच्या कडक पहाऱ्यांतही
बहरे सौंदर्याची गुलाबी दौलत कशी !
मेघांत सावळ्या विलसे सोनसळी
निळ्या करुणेला पाझर फुटतां
मातीच्या मलिन कणांचे बनती मोहक मोती !

कास धरी दृढ निश्चयाची
उजळेल तुझ्या प्रगतीची दिशा
निसर्गाची अतुल खरी जादूगिरी
करील सख्या, कायाकल्प तुझा
जीवनीं प्रगटे क्षण भाग्याचा " !

धीराचें वरदान तें लाभतां जीवा
वळावली आकांक्षा सुंदर होण्याची
स्वप्नांत रम्य त्या लोचन रंगतां
चालली साधना मूकपणें निर्जनीं
दिव्याकृति अस्पष्ट कोणीतरी
फिरवी जादूची अंगुली मजवरी
सर्वांगांतुनी पसरे चमक विजेची
त्या क्षणीं सारी पालटली अवकळा
ओळख पटेना माझी मला !
फुलाहुनी मृदुल आणि तरल झाली तनू
किती सुरेख नाजूक जडले पंख मला
इंद्रधनूची खुले त्यांवरी सप्तरंगी किमया
हर्षभरें बागडतां भान विरे
वाटे हवासा मी आतां सकळांना
घुमती श्रवणीं बोल कौतुकाचे

बघतां मज गुंगती लडिवाळ नवकलिका
आलिंगुनी प्रीतिनें चुंबनमधु देती
आग निवाली हृदयाची
संपला दारुण तो अज्ञातवास
सुरवंटाचें सुंदर झालें फुलपाखरूं !

# शरदाची पहाट

( जाति-शुभवदना )

सुप्रभात शरदाची हसत मंद आली
अरुणकांति खुलत मुखीं शुक्रहिरा भालीं

शीत पवन संथ झुले
वनबाला गात डुले
श्यामल पथिं मखमाली पायघड्या घाली

तलम हिमानी वसनीं
विलसत ही भूरमणी
स्वप्न गुलाबी बघतां दंग मनीं झाली

ओघळती दंवमोती
तृणपानें थरथरतीं
शोभे वनराई जशि गर्भवती न्हाली

हलु धूसर उजळे नभ
घरट्यांतिल गोड ऊब
सोडवेन विहगांना त्या सुरम्य कालीं

सनईचा मधुर सूर
मंदिरांत घुमत दूर
सोनेरी जादुगिरी लहरे वरखालीं

हिरवळल्या सरितातटिं
नृत्य करी छायानटि
मुरकत ये जलभरणा तरुणी लडिवाळी

दरघळलीं हरित वनें
होत खुलीं रंगघनें
सुप्रसन्न सृष्टिवधू साज नवा ल्याली

मोहरले शेतमळे
कष्टांचें सुख पिकलें
शारदीय सुंदरता विहरे भंवताली

शांतिसवें मंगलता
प्रेमभेट दे जगता
संसारीं भाग्याची साजे दिपवाळी !

राज्य ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७३८३४ दि: 

# श्रावणांतली रात्र

( जाति - जलधारा)

पांघरुनी शाल निळी सांज पातली
नवतीच्या रंग सुखीं भूमि सावळी

श्रावण हा मनहारी
गमतीचा खेळ करी
ओलेती वनवाला गोड लाजली

धूसरलें नभ सारें
पुनवेचा चंद्र झुरे
खिडकींतुनि अंधुक मी दूर न्याहळी

हरित पथीं तम पसरे
जलधारा संथ झरे
रात्र निघे अभिसारा चोरपाउलीं

चपळ गार झुळकीनें
चावळतीं अचल वनें
कोटरांत खगयुगुलें भीत बिलगलीं

नीरवता सलत मना
चाहुल मी घेत पुन्हा
वाजे हळु दार कसें, ओढ लागली

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ८४१८
(स्थल प्रत)

पारिजात गहिवरतां
ये प्रकाश ओझरता
अंगणांत पांढुरकी फिरत सावली

घाली मज साद कुणी ?
विस्मित मी होत क्षणीं
भिजत पावसांत सखी मधुर हासली

सजल मिठी पडत गळां
विरघळल्या विरहकळा
गमत जिवा प्रिय रजनी श्रावणांतली !

# अमर तृण

(मुक्तछंद)

मंद वायूच्या झुळुकीनें
डोलतें कसें हें तृण पोपटी !
मऊ ओलसर तो स्पर्श त्याचा
गोड गुदगुल्या करी तळव्यांना
नाजूक नाचरी हिरवी लोकर ही
क्षणांत सुखवी शिणल्या नजरेला
उजळत्या निळ्या स्निग्ध नभामधली
त्यांत रुळे ती लाल पिवळी लकाकी
अल्लड बालकाच्या लुसलुशीत गालांवरची
हासरी नव्हाळी जडली त्याला
लाजऱ्या कळ्यांच्या लोभस ओठांतली
सुगंधी गुजें झुलतीं त्यावरी
चंद्रकलेची शीतळ कोवळी किमया
सान तृणांकुरांच्या सतेज गात्रीं लहरे

पसरुनी मोहक कागद कीं हिरवा
सांजसकाळीं प्रकाशसुंदरी
सोनेरी अक्षरांनीं त्यावरी लिहिते
प्रणयलेख ते मधुर किती !

छायाराणी सुकुमार करांनीं
किरणांच्या कलात्रतूची
कमनीय कलाकुसर ती कशी
गुंफिते या मखमाली गालिच्यावरी !
चपल रानपऱ्यांच्या रुपेरी नूपुरांचे
विनाद मंजुळ आसमंतीं घुमती
दरवळ पसरे शांतीच्या हास्यफुलांचा
छेडित मधुवीणा मधुर सदा प्रीती
विलासी वैभवाचा परिवार सोडुनी
स्वर्ग खालीं उतरे घ्यावया विसांवा
श्यामल सखीच्या स्नेहल बाहुपाशीं !

प्रिय वसुंधरेचें मंगल सौभाग्य हें
वितरी ग्वाही रम्योज्ज्वल संसाराची
अविनाशी तिच्या यौवनकांतीची
ही अखंड फडके हरित पताका
बाळपणीं बागडलों मी मोदभरें
वत्सल हिरवाळीच्या दंवभूषित अंकीं
क्षितिजाच्या ओठीं दिव्य गीतें स्फुरतां
तरल धुक्याच्या धवल सागरांतुनी
प्रगटती सौंदर्याच्या स्वर्णलता
निशेच्या पेंगुळल्या पापण्यांतुनी

भुरभुरतीं प्रकाशाची ंगित फुलपाखरें
काळ्या मातीच्या रेशमी रोमांचांत या
सामावली अद्‌भुत संजीवक माया
ती फुलवी माझ्या दग्ध मनाला पुन्हा !
पोरकी ही माझी कविता
पोसली पाचूच्या सुकोमल कोंदणीं
सावळ्या मातेच्या चिमण्या लेकरांनीं
निर्मळ मैत्रीचा चाखवुनी अमृतमेवा
अमर कथा जीवनाची ऐकवितां मला
अविश्रांत झगडयाची दिली प्रेरणा

गेलीं साम्राज्यें, निमाले विश्वजेते
संपदेचे पसारे, गर्वाचे उत्तुंग मनोरे
विक्रमाचे तारे मावळले ते सारे
राहिलें मात्र हें अजिंक्य तृण मागें !
मत्सरवेडया ग्रीष्माचे त्या
अगणित भीषण अग्निसिंधू
अगस्तीच्या बळानें रिचवुनी पोटीं
प्रलयाच्या प्रभंजनाची तमा न धरितां
आपदांचे वज्राघात शिरीं कोसळतां
जुलमाचे रणगाडे हासत उरीं झेलुनी
युगांच्या दारुण दुःखांचें हालाहल तें

प्राशुनी मृत्युंजय शिवापरी त्यानें
टिकविली अढळ आपुली जीवननिष्ठा !
हिरव्या चैतन्याची चिरंतन ही ज्योती
शिकवी क्रान्तीचा प्रेरक मंत्र जगाला
चिमुकल्या अहिंसक हिरव्या पात्याची
पहा मानवा, अतुल करामत ही !
सर्व भक्षक बलशाली महाकाल हा
लीन झाला क्षुद्र गवताच्या पायीं
दृश्य हें निरंतर स्फूर्तिदायी
या अमर तृणाचा गर्जा जयजयकार !

# जाऊं दे मज दूर

(जाति-वधू)

जाऊं दे मज दूर जरा !
हा लोभ सखे, इतुका न बरा

ओतित पवनीं स्वैर लकेरी
वाटे घ्यावी ऊंच भरारी
स्फुंदत अशि कां राहसि दारीं
करुनी अडसर गौर करा ?

कोषकिडयापरि या सुखधामीं
काळ विलासीं घालवितां मी
होउनि माझे पंख निकामी
आटे हृदयीं स्फूर्तिझरा

नच धरितां भय व्याधशरांचें
अमृतफळ चाखीत नभींचें
खोलुनि वैभव हिरवाळीचें
सुखविन शिणल्या मुशाफिरा

व्याकुळलें किति भंवतीचें जग
डवरे माझ्या उरीं निळा ढग
गार सरीनें वारुनि ती धग
खुलविन दुःखाकुल नजरा

काढुनि शल्यें विद्ध जिवांचीं
स्मितें उधळितां मुग्ध फुलांचीं
गात थोरवी संसाराची
नवकिरणीं नटवीन धरा

वेचुनि कणकण ध्येयपूजना
गर्जत येतां संकट–सेना
होत पुढे जे दीनरक्षणा
गौरविण्या त्या नरवीरां

दंग तांडवीं भीषण काली
देउनि आहुति ज्यांनीं अपुली
मानवतेची ध्वजा रोविली
घुमवित त्यांची अमर गिरा

भोगाहुनि त्यागांत दिव्यता !
कर्तव्याचा पथ आक्रमितां
चिरसुंदरता वरी जीविता
प्रीति न साजे स्वार्थपरा !

साठवुनी त्या ओठीं गुपिता
काढ गळ्यांतिल बाहू आतां
हसरे अश्रू नयनीं खुलतां
विरह गमे हा मधुर खरा !

# देवाचा शोध

(छंद-परिलीना)

"आहे देव कोठें," पडलें कोडें
घेत शोध त्याचा मी चोहीकडे
जागृति-स्वप्नीं तो ध्यास लागला
कधी त्याचें घडे दर्शन मला ?
बाळपणीं भाव रंगला भोळा
गोल किती दडे करोनी गोळा
बकुळीखालीं त्यां पूजीत सुखें
वय वाढें तसें विरे तें धुकें !

चतुर्भुज मूर्ती शोभे राऊळीं
भक्तिपुष्पें तिच्या पायीं वाहिलीं
नाचे कीर्तनीं मी वाची पुराणें
करी तीर्थयात्रा, तपःसाधनें
रम्य निसर्गाची नटे मोहिनी
गुंगवी जीवा तो दिव्य गायनीं
तृषा परी तेणें निवेना माझी
वाटली सुधा ती ठरली कांजी !

थोर महात्मे ते विश्वकल्याणा
सोशिती धैर्यानें घोर यातना

उभारुनी झेंडा क्रांतिवीरांनीं
दिली प्राणाहुती स्वातंत्र्य-रणीं
कवि, कलावंत, विरागी संत
देह जे वेचिती जनसेवेंत
रूपें प्रभूचीं हीं मानुनी भजे
तरी चित्त राहे अशान्त माझें !

घाली पथीं खडी दीन मजूर
भार वाहुनी हा हमाल चूर
खपे गिरणींत भुकी कामाठी
घेत शिरीं भंगी घाणीची पाटी
उन्हांत कुणबी नांगर धरी
पिके धरित्री त्या स्वेद-निर्झरीं
महिमा गातो मी या श्रमिकाचा !
पूजक तो खरा मानवतेचा
साजे कर्मयोगी युगनिर्माता
तो हा जगदीश जीवनदाता !

# आव्हान

( जाति-चंद्रकांत )

[ शूर 'पाया गोया' नें दर्याशीं झुंज खेळून आपल्या सहकाऱ्यांचे प्राण वाचविले व कर्तव्यपालनासाठीं आनंदानें आत्माहुती दिली. ही रोमांचकारी घटना दि. २०-२-१९५४ ला घडली. हिंदी नौकादलाची परंपरा उज्ज्वल राखणाऱ्या या धाडसी दर्यासारंगाच्या मुखांतून मरतां मरतां समुद्राला उद्देशून असेच उद्गार निघाले असतील ! ]

खुशाल कर गर्जना !
सागरा, देत तुला आव्हान ॥धृ०॥

थयथय नाचत विराट बाहू भिडवी उंच नभा
खिदळत राही धुंदपणें तूं चाटित लाल जिभा
घोर आपला उघडी जबडा विस्फारुनि डोळे
धिक्कारुनि तुजला ही नौका 'हसतमुखी' डोले
मायभूमिच्या पावन कार्या प्राण करूं कुर्बान
सागरा, देत तुला आव्हान !

वृथा वाहसी गर्व कशाला, आवर छंद खुळा
विसरलास कां धडा तुला जो टिटवीनें दिधला ?
वंशज आम्ही तेजस्वी त्या असूं अगस्तीचे
आम्हांला नमवाया बळ हो निष्फळ काळाचें

रगडूं पायीं तुझ्या उरांतिल सूडाचा सैतान
सागरा, देत तुला आव्हान !

प्रिय माता ही संकटिं असतां लेखुनि हीन तिला
परक्यांना वश होउनि तिजशीं द्रोह तुंवा केला
कुटिलपणें तूं पेरिसि कांटे प्रगति–पथीं आतां
कृतघ्नतेचा कळसच हा तव खंत नसे चित्ता
हटूं न मागें जरी तुटोनी पडे शिरीं अस्मान
सागरा, देत तुला आव्हान !

सत्वपालना सिद्ध तिचीं ही मृत्युंजय बाळें
रामशराचें तेज आमुच्या नसांतुनी उसळे
धन्य मुनी तो दधिची सांगे दिव्य मंत्र कानीं
होऊं फिरुनी प्रगट कचापरि पोट तुझें चिरुनी
बांधिल तोरण अढळ यशाचें मंगल हें बलिदान
सागरा, देत तुला आव्हान !

# हिरवें माहेर

( जाति-दोहा )

सूर्यास्तीं या सुंदर हा शांत किनारा साजे
पाहुनि त्याला आज पुन्हा दंग बने मन माझें
गवतामधुनी मुरकत ही पाउलवाट निघाली
झुलतां छाया कुजबुजती वृक्षलता भंवताली

खिन्न जिवाला शांतविती शीतळ वायूलहरी
मुरकत चाले घट भरुनी रानकिशोरी हसरी
मोहक चिमणीं तृण-सुमनें बागडतीं आनंदें
मखमाली कण मातीचे मोहरले मधुगंधें

देवालय हें जीर्ण उभें मान घालुनी खालीं
लांबवुनी कर सोनेरी पिंपळ त्या कुरवाळी
उभय तटांना मानवलें बंधन भव्य पुलाचें
गोल कमानींतुनी घुमे कूजन पारवळांचें

वेत डोलती चाळ पदीं बांधुनि जलवलयांचें
बन वेळूंचें बाज़ला गुंगत नादें नाचे
पाय सोडुनी संथ जळीं औदुंबर घे डुलकी
घाट सावळा थाट नवा गर्द मळ्यांचा निरखी

पांघरुनी पट पाचूचा खुले पटांगण मागें
मावळल्या स्वप्नावलिची चाहुल तेथें लागे

दूर कडेला विस्तरला मंडप वटवृक्षाचा
सावलींत त्या साठविला ठेवा स्निग्ध सुखाचा

कंठ झणीं दाटे बघतां स्थानें प्रिय हीं सारीं
मंजुळ मैना स्मरणांची घेत उरीं ललकारी
भानहरी ती रम्य किती दुनिया बाळपणाची
हिरवी जादू मज दावी स्वर्णखनी नवलाची

उभारितां पुलिनांत गुढी बहरे भावहि भोळा
शंख शिंपले सान वयीं केले सादर गोळा
रंग मनोहर मधुमासीं बहरे वनराईचा
स्वर वेणूचे झुळझुळतां गुंग थवा गाईंचा

पुष्पांतिल सौंदर्याच्या चुंबित अमृतकण ते
स्वैर फिरे मी नदिकांठीं पाश कशाचे नव्हते
होत रिता नच कोष कदा पृथ्वीच्या विभवाचा
देवांसहि वाटे हेवा बाल्यांतिल भाग्याचा

गीत युगांचें गात मुखें प्रेमळ सरितामाओ
सृष्टिसखी दिव्य कलेची प्रकट करी चतुराओ
गहिरी शांती गोड गुजें सांगे सांजसकाळीं
हिरवाळीच्या माहेरीं प्रीति रमे लडिवाळी

खेळगड्यांसह परि आतां यक्षभूमि ती ढळली !
वाऱ्यावरि आकांक्षेचीं कांचनपर्णें विरलीं

थकलों पुरता सोडवितां
गरिबांची हो गळचेपी
पोपटपंची पोटाची
रुधिराश्रू मानवतेची
थोरपणाचा छंद खुळा
हास्यकळ्यांचा संसारीं
स्फुरतां सुंदर शैशव तें
प्रौढत्वाचा पाश तुटे
येत मंद रुणझुण कानीं
फिरुनी हृदयीं प्रज्वळली

नियतीच्या निरगांठी
कुटिल जगाच्या हाटीं
विटली पढतां वाणी
विणती करुण कहाणी !
अंध करी मनुजाला
सुगंध दुर्मिळ झाला !
आतुर डोळे निवले
ढग चिंतेचा वितळे
पीतारुण संध्येची
ज्योत नव्या आशेची

# कांचनमृग

( छंद-हरिभगिनी )

गोड अस्फुट बोलांनीं कोणीतरी साद घाली
आसावुनी रात्रंदिनीं भोंवताली मी न्याहळी
मुग्ध शैशवीं माउली सिद्ध मला सावराया
नित्य नवी मौज दावी बकुळीची स्निग्ध छाया
नटे छान यक्षपुरी बालमित्रांच्या संगती
डोकावुनी हळू दारीं खुणावी ती दिव्याकृती
निघे तिला भेटाया मी पडे मागें भातुकली

जात शाळेंत जरी त्या लक्ष नसे रुक्ष पाठीं
गूढ लागे ओढ उरीं सुचती ना खेळ गोष्टी
सांजवेळीं माळावरी रम्य साजे मयसभा
स्वर्ण मृगासंगें दूर देवदूत राहे उभा
तिमिराच्या मांडवाला मोहरती चंद्रवेली

पहाटेच्या पैंजणांनीं पाचूतृणें शहारतां
पाहिलें त्या अेकदा मी अंगणीं या बागडतां
धरूं जातां त्वरें कसा लुप्त झाला विजेपरी !
चित्रली ती खोल नेत्रीं छबी त्याची भानहारी
आहे कुठें कळे ना तो, आस तरी दुणावली

सान घरटें सोडुनी जीवपक्षी घे भरारी
जाळीं रेशमी गुंफितां प्रीती बोलावी लाजरी
खुले कमळांच्या दळीं घास कोवळ्या मोत्यांचा
जडे पुन्हा छंद मना सोनेरी त्या सारंगाचा
मागं त्याचा काढीत ही फेरी अखंड चालली

शोधी रानींवनीं त्याला जिणें लावुनी पणाला
वाणा फकीरी घेउनी करी दुःखी मी स्वतांला
नाही क्षणाचा विसावा चक्र पायीं कीं बांधिलें
फिरे जगीं वेडयापरी साथ निराशेची मिळे
तिनें परी जगण्याची जिवा खरी स्फूर्ती दिली!

फोल होती यत्न सारे एक लाभ घडे तरी
मला रंजवी निसर्गा ! तुझी अवीट माधुरी
विषादाच्या वणव्यांत माझी काव्यलता फुले
रंगुनी त्या नादें तुझ्या सौंदर्याचें पान केलें
तृषा अन्तरींची माझ्या नाही परंतु निवाली

# पहिला मेघ

( जाति-पतितपावन )

मोहक पहिला मेघ सावळा क्षितिजावर आला
ती शुभवार्ता कळवी स्नेहल संध्यानिल सकलां
मत्त जसा गजराज मजेनें अद्रितटीं चढला
झूल विजेची छान शोभली डौलदार तनुला
शिंग-खुरांनीं उधळित माती अवखळ त्या नादीं
कैलासाहुनि सुटे मोकळा पुष्ट कसा नंदी !
मंद गर्जना देत मयूरा मोद नर्तनाचा
साज निळ्या मांडवास जडला भव्य तोरणाचा
संथ कशी त्या खालुनि चाले बगळ्यांची माळा
स्वर्गंगेतिल कुमुदांचा तो डुलतो कीं मेळा
बाहु उभारुनि वृक्षवल्लरी सुस्वागत करिती
सस्मित वदनीं वरुणदूत तो सरसावे पुढती
मंगल त्याचें दर्शन घडतां लोपुनि भान क्षणीं
स्वैर भरारे धुंद पावशा आक्रंदत गगनीं
तृषित वनींच्या उत्कंठेला पंख जणूं फुटले
मूक धरेच्या उरीं दडपलें दुःख वरी उसळे
ज्योति उफाळे स्फूर्तीची वा धरित नवा छंद
जागृतिच्या किरणांनीं उकली हृदयाचे बंध.

* * *

मनीं रंगली कशी वारुणी न्याहळितां त्याला
मळा गुलाबी पुलकांचा त्या मृदुगात्रीं फुलला
अस्तगिरीच्या पुष्करणींतुनि सुरसें कीं भरुनी
कांचनघट हा मुरकत हसरी सुरबाळा आणी
निरोप घेतां वनराणीचा प्रेमळ दिनराणा
चुंबुनि तिजला अर्पित जणुं तो अमोल नजराणा
स्वर्णशिखर मेरूचें झुलतें काय अन्तराळीं ?
यक्षपुरीचें विमान फिरतें रम्य सांजवेळीं
दुनियेचें या दैन्य पाहुनी द्रवली प्रभुकरुणा
रुचिर घनाच्या रूपें प्रगटे स्वर्गींचा खजिना
स्वप्नांचा तो सुरम्य झुलता मनोराच गमला
गगनश्रीनें कल्पसुमांचा गुंफियला झेला
कुंभ सुधेचा अमरावतिच्या गर्वासह हरुनी
ये जयशाली गरुड जसा प्रिय मातेच्या सदनीं
विश्वहिताची वाहुनि चिंता संतजनीं पोटीं
वैकुंठाहुनि पुण्यफळांची पाठविली पेटी
रुसल्या अल्लड जगबाळाचें पुरवाया कोड
संध्यामाओी पुडा खाउचा आणित का गोड !

*            *            *

स्थिर दृष्टीनें निरखी सृष्टी साहुनि प्रखर कळा
सुखवाया तिज सदय लाडका श्यामसखा सजला

स्तब्ध कशी त्या समयीं दिसलीं तान्हेलीं रानें
कोण करी हीं चित्रित विजनीं करुणेचीं कवनें ?
सोसवे न धरितीला सासुरवास उन्हाळ्याचा
धीर तिला तो शिलेदार दे पाउसराजाचा
ओलावा त्या आपुलकीचा आवडला तिजला
नजरेंतिल ती नाजुक जादू दंग करी त्याला
सहजच हसतां देह सखीचा रोमांचित झाला
त्या चतुरानें हेतु मनींचा अचूक ओळखला
छटा हासरी चराचरांच्या म्लानमुखीं पसरे
प्रसन्नतेची प्रभा कोवळी चोहिकडे लहरे
रुक्ष हवेला शीतळतेचा स्निग्ध लेप चढला
स्वस्थ पहुडल्या हिरवाळीचा नूरहि पालटला
अचल राहिला पथीं गुरांचा कळप घरा वळतां
गुंग होऊनी गोपहि घुमवी पावा आवडता
दूर सारिले जलाशयांनीं बुरखे शेवाळी
खिळले त्यांचे आतुर डोळे रंगित आभाळीं
सोनसळ्यांचा नेसुनि शालू नृत्य करी छाया
नवरंगें झुडपांच्या नटल्या काटेरी काया
देवाघरचा साखरमेवा झेलाया हातीं
किती भुकेलीं तृणपानें तीं सिद्ध कशी होतीं !

कोण काढिते काळीवर हा कशिदा जरतारी ?
खोपी मधुनी बघे वाकुनी भोळा शेतकरी

*           *           *

क्षण भाग्याचा खुलवी सुकल्या आशाकलिकांना
छेडित वीणा वर्षारमणी मंजुळ घे ताना
मुरके श्यामल मेघामधली प्रेमाची यमुना
रंग खेळतो जणूं नभींच्या कुंजवनीं कान्हा
धावत आली दुडदुड खालीं रजताची धार
विरला झरझर खिन्नपणाचा काजळथर सारा
सौंदर्याच्या मोहनलहरी झुळझुळती भंवती
आनंदाचा स्वर्ग त्यांसवें उतरे भूवरती
सायंदेवी सुंदर ल्याली मोत्यांची जाळी
ओल्या वसनीं तिच्या वहरली नवतीची लाली
गार सरीनें थरकत गहिरी वनराओ खुलली
उभी लाजरी जशी अप्सरा भिजुनी चिंब जळीं !
रिमरिम झरतां निळावंतिचे धागे मखमाली
उडुनी झापड धूलिकणांची चर्या टवटवली
माळदऱ्यांना फुलवित हसरे निर्झर बागडती
उन्मादाचे दुंदुभि दाही दिशांत दुमदुमती
नांगरलेलीं शेतें न्हालीं दिव्य झळाळीनें
अंथरले भरजरी गालिचे कुणी यक्षिणीनें !

कौलारीं तरुशिखरीं झळके उटी कापुराची
आर्द्र कोटरीं खेटुनि वसलीं युगुलें विहगांचीं
हेलावे वरखालीं सागर सजल सुगंधाचा
सुटला विळखा वैशाखाच्या भीषण वणव्याचा
निवले आत्मे भूमातेच्या आर्त लेकरांचे
सर्वांना तें समान मिळतें दान निसर्गाचें !
तृप्तीच्या कलशांतिल अमृत पिउनी जग धालें
शांतिसुखाचें संसारीं नवपर्व सुरू झालें
सृष्टिवधू प्रणयाच्या पहिल्या माधुरींत रमली
धवल रेशमी शाल तिजवरी रात्र हळू घाली

# तृष्णा

## ( सुनीत )

रंगे सागर अन्तरीं विलसतां सूर्यप्रभा लाजरी
पृथ्वीच्या पदरा हळू विलगुनी तो कानगोष्टी करी
सौंदर्ये नटली निसर्गरमणी आनंदवी लोचनां
ती दैवी करुण सदैव जगता देते नवी प्रेरणा

लाखों दीनमुखें मजूर गिरणी-खाणींतुनी राबती
त्यांच्या शोषुनि उष्ण जीवनरसा पोसावती दौलती
कष्टाळू कुणबी मळे पिकविण्या धारातपीं नाहती
भांडारें वितरी अनेक परिचीं ही थोर आई किती !

दुःखाचे शर साहुनी कवि सुखें घे भाववीणा करीं
रेखी त्यापरि तो कलाप्रिय कुणी चित्रावली साजिरी
ज्ञाते, शोधक, संतहि जनहिता संगोपिती आदरीं
सेवेच्या मधुसिंचनें सुभगता ये संसृतीला खरी !

"लक्ष्मीचा भुवनांतल्या अखिल या स्वामी असूं आपण"
तृष्णा दारुण देत ही तव नरा, नाशास आमंत्रण !

# गोड स्वप्नें

(सुनीत)

गातां एकसुरांत दोन रमलीं शाखेवरी पाखरें
झालीं दंग वनें उन्हांत कवळ्या चाऱ्यांत तेवी गुरें
घेतां मोहक पायवाट वळणें दृष्टी भिडे नाचरी
दोघांना नच बोलतांहि पटलें तें गोड कांहीतरी !

सृष्टीला खुलवीत कोमल करीं चैत्रांतली चारुता
लागे चाहुल लाजरी तत्र सवे, तारा नभीं हासतां
उत्कंठें क्षण मोजितां तरुतळीं भेटावया चोरुनी
वाजे खुट्ट कुठे, बुजे उमलत्या ओठांत संजीवनी

होतां लोभस ती स्मृती परि असां दाटे व्यथा अन्तरीं
आकाशीं चढतां पतंग पडला काटयांत कोठेतरी !
लाथाडी अधना कठोर दुनिया, आशा झुरे लाडकी
डोळ्यांतील सरींत जाय विरुनी तो प्रीतिचा स्वर्ग कीं

'स्वप्नें गोड' उशीवरी सुबक या त्वां कौशलें गुंफिलीं
डोकें त्यांवरि टेकतां नच कळे निद्रा कुठें गुंगली !

# पाणवठा

( जाति-भूपति )

स्मितरेषा रविची विरतां क्षितिजावरली
दुःखाचें पसरे दंव धरितीच्या गालीं
धुरकटल्या गगनीं पाकोळ्या गिरगिरती
घनछाया दाटे विषण्णतेची भंवती

घट भरतां हासत वदती गोड विनादें
तनु रोमांचित हो मंजुळ कंकणनादें
त्या भुरकन गेल्या सोनसळ्या माघारीं
कण मात्र धुळीचे पडले माझ्या पदरीं !

पेंगुळलीं बाळें हिरवाळीचीं सारीं
सुस्कारे सोडी जांभळ गर्द किनारीं
आठवीत माया विस्कटल्या घरट्याची
घे आर्त लकेरी मैना तिनिसांजेची

पाजळी सानुली ज्योत काजवा रानीं
न्याहळी निळ्या बुरख्यांतुनि ताराराणी
जुळवीत पुन्हा ते मूक मनाचे धागे
या निर्जन जागीं एकलाच मी जागे !

हळु काळा पडदा रात्र भूतलीं पसरी
कालिया भयाचा डंख काळजा मारी
हिमवातें होती कंपाकुल तरुलतिका
राक्षसी निराशा घाली मजला विळखा

ही स्नेहधार किति गुरां पाखरां सुखवी
शेजारिल गांवा देत दिलासा तेवी
श्रम नुरवी शीतळ ओंजळिनें पथिकांचे
समभावें फुलवी जीवन ती सकलांचें

परि अखंड येथे तिष्ठत मी तान्हेला !
कधि आपुलकीचा मिळेल अमृतप्याला ?
सोबती मला दुनियेंत एकही नाही
मी शून्य दृष्टिनें दूर कुठें तरि पाही

एकलेपणाची ज्वाला हृदया जाळी
नियतीचें दारुण वज्र तळपतें भाळीं
भोगतां सजा ही जितेपणीं मरणाची
पापण्यांत थिजतीं सोनफुलें आशेचीं

अज्ञात कुणी कवि मध्यरात्रिच्या प्रहरीं
ये स्वैर घनापरि उधळित करुणालहरी
मम दैन्य जाणुनी लोचन त्याचे स्रवती
सर्वांगीं पल्लव मृदु शांतीचे फुटती

ते दिव्य बोल जणूं दीपकळे स्फूर्तीचे
चांदणें बने त्याक्षणीं दाट तिमिराचें
शवाळेहि सारें वैफल्याचें वितळे
मी डुले सुखें, हृदयींचें शल्य निमालें !

# गुलमोहर

( मुक्तछंद )

वैशाखांतिल ऐन दुपार
तप्त करांनीं कवटाळी धरतीला
डोळे मिटुनी गहिवरल्या कंठानें
तीव्र कळा ती सोशीत बिचारी
विसरुनी पहिली आपुलकी
देत डागण्या तिच्या दुःखावरती
कुटिल कसा रवि वैभव शिखरीं तळपे !
दंग विलासीं मदांध सत्ताधारी
अवगणुनी सोनेरीं आश्वासनें
दडपीत पायीं जसा दुबळ्या प्रजेला
हेलावे वरखालीं सागर प्रखर उन्हाचा
भेगाळुनि गेलीं भकास काळीं रानें
गर्द जाळींत शोधीत निवारा
घायाळ श्वापदापरी कण्हतो वारा
तुरळक छाया थरकत चाहुल घेती
विषण्णतेचा दाटे रुक्ष पसारा
परी मोकळ्या पिवळ्या माळावरी
मोहरला कसा हा गुलमोहर एकला !

कुंकुमाचा भव्य कारंजा कीं
आरक्त जलधारा उधळीत निर्जनीं
कांतिमान माणकांचा मनोरा
उभारी कुणी शिल्पकार यक्षपुरींचा
प्रौढ प्रतापी निसर्गसम्राटाचा
काय शोभला विशाल किनखापी शामियाना?
किंवा भूगर्भांतुनी उफाळे
लोट उकळत्या लाव्हारसाचा
फडकतो जणू तो अग्निध्वज प्रलयाचा
ग्रीष्माच्या लाल सैनिकांचा मेळा
पाजळून मशाली का येथे जमला!
पिंजारुनी जटाभार मस्तकीं
भालींच्या नेत्रांतली धगधगतां ज्वाला
रुधिरस्रावी गजचर्म तें टाकुनी स्कंधीं
संक्रुद्ध रुद्र कीं सिद्ध तांडवा झाला!

सभोंवार धरी फेरा उष्ण झळांचा ताफा
दशदिशांच्या मुखांतुनी वाहती जळजळीत हुंकार
उग्र दाहें सृष्टीची तडके लाही
नांगरल्या शेतांतुनी निघती कढत वाफा
आसमन्तीं पसरे अथांग रखरखीत स्तब्धता
स्थिरचरांच्या नजरेंत साकळे गाढ आर्तता

मोहोर मनोहर गळे वसंताचा
कोमेजले लाल फुगीर गाल रंगेल गुलाबाचे
ओघळले चंद्रकळे धुंद मोगरीचे
मावळल्या चांदण्या नाजुक जाईजुईंच्या
वनवालेची विटली हिरवी साडी
ओठ हासरे सुकले अल्लड फुलराणीचे
चपळ झऱ्यांचे पैंजण गळुनी पडले
काळवंडले किरीट गिरींचे
तरुवेलींचे झडले पाचुपिसारे
कोकिळेची पिचली मंजुळ बांसरी
तापल्या मातींत वाकलीं म्लान तृणांचीं शिरें
खच पडला त्यावरी जळक्या पानाफुलांचा
खिन्नतेच्या कृष्णपाशीं वेढिलें विश्व सारें
हे वृक्षराजा, तूं मात्र मुक्त त्यांतुनी !

किती लोभनीय लावण्यदीप्तीनें
लवथवली तव विराट सावळी काया
सकल गात्रीं कसा रसरसला
उन्मादक यौवनाचा रक्तिमा !
नसानसांत तुझ्या ओसंडते
उद्दाम सौंदर्याची सुषमा
ही अद्भुत योगमाया कशी लाभली तुला !

अनुपम हें ऐश्वर्य तुझें पाहतां
सौंदर्यपूजक नयनांचें फिटतें पारणें
मोहक या मखमाली मांडवाखालीं
खेळतो गारवा गोड किती !
घनदाट केशरी गंधित पुष्पदलांमधुनी
स्रवते वत्सलता मायमनाची
गडद अंजिरी चामरांनीं श्यामल शाखा
जाणविती सुहृदाच्या संगतीचा गोडवा
शीतळ मंद सुखद तुझ्या निःश्वसनीं
प्रणयातुर सखीच्या सस्मित अधरांतली
अस्फुट वचनांची भरली माधुरी
सुखवी श्रांत तनूला हा मऊ पोपटी गालिचा
मधुर तुझ्या करुणेचा मिळतां ओलावा
करपल्या जिवाला फुटते नवी पालवी
परिस्थितीच्या तप्त भयानक वाळवंटांतुनी
पाऊल पुढें उचलाया अंगीं बळ येतें

हेतु कोणता परंतु उराशीं धरुनी
आरंभिली त्वां घोर ही आराधना ?
चंडतापें पोळल्या दीन पृथ्वीचा
गमसी तूं संकटीं पाठीराखा
दिव्य कलेचा दाविंतां उदात्त आविष्कार

ऐकविसी तिला संदेश नव्या जीवनाचा
उधळित भंवती चैतन्याच्या लहरी
शांतवुनी आसावल्या हृदयांना
विफलतेचीं सांद्र धूसर पटलें झाडुनी
फुलविसी आंतला सुप्त अंगार पुन्हा !
धीर गंभीर तुझी आकृती
देते ग्वाही उज्ज्वल भवितव्याची
रुक्षपणांतहि रम्यतेचीं रुजतीं बीजें
या ज्वालामुखीच्या उदरीं जन्म घे अमृतगंगा
होईल अवघा मंगलमय संसार !
रौद्र तुझ्या दर्शनीं सखया,
दिव्यतेचा घडतो साक्षात्कार !

## सावळें रूप

(जाति-सृष्टिलता)

सहज तुला पाहिलें, सख्या मी
साठविलें या नेत्रपुटीं तें रूप तुझें सावळें

जातांना तव दारावरुनी
डोकावुनि मी बघे त्याक्षणीं
भूल पडे कशि भरल्या मार्गीं भारावुनि राहिलें

मधुर वेणु ती मला बोलवी
पाय अंगणीं मी हळु ठेवी
लक्ष नसे परि तुझें मजकडे, नवल मना वाटलें

शोभत हें तव सुवर्णमंदिर
इंद्रधनूसम तोरण सुंदर
ऐश्वर्याचा दिव्य थाट तो भव्य महालीं खुले

भरले अमृतकुंभ मनोहर
दरवळती मधुगीतांचे स्वर
स्वैर नर्तनीं शृंगाराची सुरम्य सेना झुले

"घालवुनी द्या, भिकारीण ती"
धुंद पुजारी तुझे गर्जती
सांगाया नच धजलें त्यांना नातें मी आपुलें

लोभ नसे विभवाचा मजला
न कळे, कां धरिलास अबोला ?
"'दंग विलासीं दीनबंधु', हें शल्य उरीं झोंबलें

शोभिवंत दरबारीं तुझिया
नाही स्थळ गरिबांना, राया !
अश्रूंचे सर - आवरुनी मी तेथुनि मागें वळे

हाकारित परि गर्दीतुनि ती
आली पुढती मोहन मूर्ती
-मला थांबवी बळें हासुनी, माझा रुसवा पळे

सावरिलें त्वां प्रियवचनीं मज
लाजुनि मी झणिं न्याहळितां तुज
-प्रेमळ एका स्पर्शांतच त्या अवघें सुख भेटलें !

# गुपित

( जाति–अचलगति )

येऊनि दारीं हळुच पुन्हा
वाकुनि तूं बघतेस कुणा ?

घरकाम न तें सुचत कसें
लक्ष तसें कशियांत नसे
शांत अंगणीं मूकपणीं
काय शोधिसी फिरफिरुनी ?
घेउनि हलकें हृदयाशीं
चित्र कुणाचें न्याहळसी ?
सहज गळे तरुपर्ण जरी
बावरसी, ही मौज खरी !

नेसुनि पातळ गोल निळें
गौर तनूचा नूर खुलें
आरशांत वळुनी बघतां
खेळे नयनीं चंचलता
शोभत भालीं नव टिकली
लहरे लाली तव गालीं
वेड कशाचें तुला जडे ?
लाजतेस कां बोल गडे !

भिडतां रवि हा क्षितिजाला
जीव तुझा कां गहिवरला
शीतळ संध्यानिल विहरे
अधरीं मंजुळ सूर झरे
वाजे पाउल मंद पथीं
आतुर तूं झालीस किती !
पसरे छाया स्तब्ध वनीं
दाटुनि ये तव कंठ झणीं

उधळित गगनीं स्वप्नफुलें
रजनीचा मनचोर झुले
दीप उजळतां शेजघरीं
थरथरती मृदु हात परी
गुपचुप आलें जवळ कुणी
भोळी प्रीती दंग मनीं
खुदकन् हसतां स्नेह जुळे
गोड तुझें तें गुपित कळे !

# अमृतझरा

( छंद-स्मर )

वाहे घरीं माझ्या गोड झरा अमृताचा !

गात सखे, तूं भूपाळी
सडा घालितां सकाळीं
छान रेखिसी रांगोळी
झुले अंगणीं गुलाबी मळा सुगंधाचा.

तुझ्या ओंजळीनें कसें
चढे वेलींना बाळसें !
मधुस्मिताच्या प्रकाशें
जडे मना सदनाही साज सुवर्णाचा;

दिव्य आनंदाचीं फुलें
तशीं नाचतीं हीं बाळें
पुरवीत त्यांचे लळे
चाले तुझा नित्य पाठ श्रमपूजनाचा

गरीबीच्या संसारांत
मीठ भाकरीची साथ
सुख मानुनी तूं त्यांत
मला अर्पिसी पिसारा नव्या उमेदीचा

येतां दारीं दीन कोणी
त्यास देशी अन्नपाणी
खरी शोभसी गृहिणी !
वसे तुझ्या मृदु हातीं निधी मंगलाचा

सायंप्रकाशीं सोत्कंठ
नाठवितां निजकष्ट
पाहसी तूं माझी वाट
खुले तुझ्या नेत्रीं गोफ अिन्द्रधनुष्याचा

तेजाळतां फुलवात
आळविसी प्रभुगीत
शांतरसें मी त्या न्हात
उरीं माझ्या पारिजात फुलें दिव्यतेचा

निद्रा मंजुळ पैंजणीं
जिवा गुंगवी शयनीं
प्रीती लाजऱ्या बोलांनीं
चंद्रमहाल उभारी स्वप्नसुंदरीचा

वश होतां कधी स्वार्था
धुंद अहंकारीं वृथा
तुझी थोरवी नेणतां
उपेक्षिलें तुजला मी वाटे खेद त्याचा !

तुझा रेशमी जिव्हाळा
शांतवुनी तीव्र कळा
जगीं सावरीत मला
ऊनपावसानें रंगें खेळ जीवनाचा

०  ०

# कुळवाचे पडसाद

( जाति-साकी )

ग्रीष्मामधल्या मध्यान्हींचा रवि माथ्यावरि तापे
वरिला फेरा प्रखर झळांनीं माळद्री थरकांपे
आर्त कोकिळा साद घालितां पिकलीं पानें कण्हतीं
न्याहळतीं हळु म्लानतृणें तीं उचलुनि माना वरती

स्वैर सभोंती वेडा वारा खिदळत उधळी ज्वाला
स्तब्ध सावळ्या सृष्टिसखीचा कंठ दाटुनी आला
कोण उभा तो उघडया अंगें, उग्र दिना अवमानी
घेत खडी ललकारी धीरें औत चालवी रानीं !

खेचुनि दोरी फिरवित आसुड खिन्नतेस कीं पळवी
अवकाळीं बळ अेकवटोनी काळीला तो कुळवी
ताठर बनवी स्नायुशिरांना राबणुकीचा ताण
पीत आग ती स्फूर्तीचें जणुं फडके उंच निशाण !

घामेजुनि ती श्यामल मूर्ती तीव्र आतपीं झळके
निर्धनतेची देत साक्ष तें फडकें कटिचें मळकें
कणखर चरणां किटण चढे त्या जळत्या धूलिकणांचें
घेती.बैलहि दोन अिमानी श्रमण्याचें व्रत त्याचें

खडकांमधुनी उतरे श्यामळ पिवळया गर्द तुऱ्यांनीं
कठिण दशेच्या खुलत कोंदणीं खेडयाची जिनगानी
वाढवितो कस जमिनीचा तो शिंपुनि जल रुधिराचें
झगडयांतुनि या अखंड घडतें दर्शन दिव्यत्वाचें

मुक्या पशूंचें मुख फेसाळुनि निघती वाफा नाकीं
धापा टाकित धनी तयांचा चुचकारुनि त्यां हाकी
धारदार तें नांगरपातें खोल उराशीं भिडतां
द्रवली प्रेमें भोळी धरिती सोडुनि सारी जडता

उतरे त्याच्या घोर तपानें तोंड कसें दिवसाचें !
स्नेहल संध्या स्थिरचर जगता गोंजारी मृदुत्वाचें
काजळुनि तों क्षितिज–किनारा वादळ डंका वाजे
धुंद दिशांच्या हुंकारांनीं हृदयीं काहुर माजे

मत्त भयानक मेघ–विजांचें तांडव गाजे गगनीं
थरकत नादें तरुमाला त्या दंग क्षणीं अनुकरणीं
घरटयांतुनि मृगपक्षी उसळे बाणापरि बाहेरीं
फोडित टाहो ऐन तुफानीं घाली निर्भय फेरी

घुमती धूमिल वातावरणीं पेरणिचे पडसाद
वसुधेच्या क्षणिं नसानसांतुनि ओसंडे उन्माद

कारंजा वरुणाचा झरझर वर्षत शीत फवारे
गंधोत्कट मातीला फुटती कोमल बीज–पिसारे

हेलावुनि क्रांतीच्या लाटा विजयी तारे ढळती
वाळूमधल्या पदचिन्हांसम राजवटी त्या विरती
ठरला काळासहि भारी हा शेतांतिल झुंजार !
सावरिला हिमतीनें यानें दुनियेचा संसार

संतत चाले खडतर त्याचा खपण्याचा परिपाठ
निर्मल कृतिनें शिकवी सकलां माणुसकीचा पाठ
पावन हा श्रमपाझर पिकवी सोनमळा नवतीचा
संस्कृतिचा आधार खरा तो अढळ तुरा प्रगतीचा

कष्टांतुनि कृपिकाच्या फुलती आशांकुर विश्वाचे
डोल कलेचे, तोल यशाचे बोल तसे प्रणयाचे
पोशित ही शतकोटी जीवां थोर मनाची माया
गरिबीच्या परि आंचीनें ती पिचते रेखिव काया

नित्य जडे त्या मानवतेच्या सेवेची अभिलाषा
जीवन साधें जगतो त्यजुनी अभिमानाची भाषा
वरदानें या भूदेवाच्या फिटती पांग जगाचे
चैतन्याच्या उजळी ज्योती अमर गीत कुळवाचें !

# याचक

( छंद-ओवी )

अैन दुपारीं ये दारीं कुणी खिन्न भिक्षेकरी
पेटलेल्या अन्तरींचे सूर छेडी अेकतारी
लाल कारंजा नभींचा फेकी जळते फवारे
सावलीच्या कुशींतली झाली व्याकूळ पाखरें

सिंधु फेसाळे ग्रीष्माचा सोडी धरित्री सुस्कारे
भोवऱ्यांत निराशेच्या तारूं जीवनाचें फिरे
माजे रण भाकरीचें आग पेटे वरी खालीं
शुष्क ओठीं पुकारीत कसा भिकारी न्याहळी !

शिरीं केस पिंजारले जीर्ण झोळी रुळे स्कंधीं
काळजीनें सुके चर्या दिठी पाणावली मिंधी
धूळधामें ती माखली काळी रोडावली काया
लक्तरांनी लपेटली भग्न संसाराची माया

अंगणींचा सोनचांफा अश्रु ढाळी हळुवार
तप्त वाऱ्यांत निनादे भुकेचा तो भुभु:कार !
घेत आनंद सुटीचा शांत घरीं मी अेकला
त्यांत येतां विघ्न त्याचें तोल मनाचा ढळला

आपटल्या चेंडूपरी आलों त्वरें मी बाहेरीं
विद्रूपतेचा पुतळा राहे लाचार सामोरीं
खोल डोळ्यांत डोकावे बकासुर पोटांतला
लक्षिलें न परी त्याला होत रागें मी आंधळा

"घास ओला सुका घाला प्राण कासावीस झाले
घ्यावा गरीबाचा दुवा," त्याचें रडगाणें चाले
वाटे मला, "भिक्षावृत्ती असे काळिमा नराला"
आणि माझ्यांतला झणीं 'शिक्षक' तो जागा झाला

"खंत वाटे ना तुला कां जिणें श्वानाचें कंठितां ?
पहा, कामधंदा कांही सोडुनी हें सोंग आतां
आळसाच्या पिकानें हा भारावला थोर देश" !
घोट बोधामृताचे मी त्यास पाजिले सावेश

तरी कोडगा तो कसा! पुन्हा हात पुढें करी
जात वांया जलधारा पालथ्या कीं घड्यावरी
दटावीत बळें त्याला दूर पिटाळुनी दिलें
नव्या विक्रमानें जणूं तोंड माझें तेजाळलें

कृष्ण बाहूंनीं विशाल निशा जगा कवटाळी
नांव देवाचें घेत मीं चिपळ्यांच्या मंद ताली
"कष्टलों या भवपाशीं नाही आसरा सुखाचा
दावी दया प्रभुराया, तूंचि सखा अनाथांचा" !

श्रांत याचकाची मूर्ती    उभी लोचनीं त्याक्षणीं
ओशाळला जीव माझा    बोल त्याचे आठवोनी
दीन तसा असोनी मी    धिक्कारिलें मात्र त्याला
मला माझ्या क्षुद्रतेचा    खरा तिटकारा आला !

# चंद्राराणी

( जाति-मुनिकन्या )

ही, रात्र मला प्रिय वाटे
स्निग्ध कटाक्षें तिच्या लोपती तीक्ष्ण उरींचे कांटे

प्रखर कसा रवि तापवि जगता
करी प्रकट ती विकट भिन्नता
गर्वध्वज परि त्याचा ढळतां
तृषित मना जें भुलवी मृगजळ खेदासह तें आटे

सायंतारा खुलतां गगनीं
तलम गुलाबी पातळ नेसुनि
ये मुरकत ही चंद्राराणी
मधुहास्याची पसरित जादू रम्य विलासीं विनटे

पाचूतृण धरि माणिक कांती
स्वर्णरसें गिरिमेघ झळकती
वृक्षझऱ्यांचीं गुजें रंगतीं
गोकुळांत वसुधेच्या शीत ॐ गंध सुखाचा दाटे

श्रमला दिनभर कामकरी तो
सुटकेचा निःश्वास टाकितो
गोप गुरांना घेउनि वळतो
मंजुळ घुंगुरमाळांचा स्वर धूसर मार्गीं उमटे

मंद शीळ वनिं वारा घाली
खिन्न फुलांना स्नेहल वेली
गोंजारुनि घे पदराखालीं
बकुळीवरि आनंदें बहरे साळुंकीचें घरटें

रहदारीचा ओघ थांबला
भरे स्तब्धता चहुबाजूंलीं
छायासागर झुले सावळा
प्रणयी बाला प्राणसख्याची वाट बघे उत्कंठें

झगमगती सदनांतुनि ज्योती
किणकिण कंकण तालावरती
झुरुमुरु दोहनरव पाझरती
प्रभुच्या स्तवनीं मृदु झंकारीं रमली वीणा कोठें!

सृष्टिवधूला शांतिफुलांनीं
सजवित ही समतेची जननी
विहरे करुणामूर्ती रजनी
वाटी सकलां शुभ निद्रेच्या मधुर फळांचीं ताटें

विलसे नयनीं तेज हिऱ्यांचें
लाघव चरणीं तिच्या विजेचें
अंगीं मार्दव कमलदलांचें
नवनीताहुनि नाजुक हातीं उघडी गुप्त कपाटें

झेलित अश्रू आर्त जिवांचे
सेवी त्यांचें विष चिंतेचें
पाजुनि अमृत विश्रांतीचें
शिणल्या विश्वा गुंगविते कशि गाउनि कोकिळकंठें

होत कधी ती क्रुद्ध कालिका
गाजवितां प्रलयाचा डंका
थयथय नाचे वर्षत उल्का
सौंदर्याची नवमाला त्या ज्वालामधुनी प्रगटे

दूर फिरे मी बहिष्कृतापरि
मजला ती घनतमीं सावरी
जीवनकांक्षा स्फुरे अन्तरीं
हसतमुखें त्या प्रशांत कालीं स्वप्नसखी मज भेटे

# कृष्णेच्या परिसरांत

( जाति–फुलराणी )

बहु दिवसांनीं बघुनी तुजला  सरिते, माझा कंठ दाटला
घालविला तव तीरावरि तो  काळ सुखाचा मज आठवला
लोपुनि पुढला काळा पडदा  किती प्रगटती हसऱ्या मूर्ति
भेटे मोहक बाल्य पुन्हा तें  दिव्य निधी कीं आला हातीं
घालित शीतळ छत्र शिरीं ते  प्रेमळ शिक्षण, ती प्रिय शाळा !
वादसभा, संमेलन, सहली  भान मोहिती त्या मधुलीला
क्रीडांगण हें विशाल साजे  खेळगड्यांसह रमलों येथे
पाठ घेतले प्रगतीचे मी  समभावाचें जोडुनि नातें
शांत मनोहर तुझ्या परिसरीं  नटली नगरी नवरंगाची
झाली फिरुनी सजीव नयनीं  सुंदरमाला स्मृतिचित्रांची

श्यामल भूमी, हिरवी राई  सुखवी मजला तेंवि निळें नभ
वनराणीचीं ऐकत गाणीं  मधुर फुलांचा लुटला सौरभ
स्वैर पाखरूं विहरे पवनीं  पोहत मी त्यापरी प्रवाहीं
झरझर नौका कधी वल्हवी  जललहरींचें नर्तन पाही
चांदण्यांत वा ऐन दुपारीं  फिरत मजेनें हरित किनारीं
दंग कधी मी घुमवित पावा  वनमेव्याची घेत माधुरी
रंगे निर्मळ वातावरणीं  जग सोनेरी बाळपणींचें
तृणासनीं मृदु मला गुंगवी  अभिनयलाघव मेघनटांचें
तरुखालीं रेलुनी शिळेवर  अस्तोदय मी सुरम्य निरखी
हितगुज करितां सुहृदांसंगें  ध्येय अन्तरीं उज्ज्वल रेखी

'हिरवाळीच्या चंद्रकलेनें    खुले सावळी रानसुंदरी
मर्दानी हा मिरवित बाणा    शाळूराजा डुले शिवारीं
साज अमोलिक सौंदर्याचा    चढवी तुज ही निसर्गदेवी
पुण्यपताका क्षेत्राची तव    थोर मनाची द्वाही फिरवी
वीर तुझे गर्जती पवाडे    गौरविती तुज संत आदरें
पावन या रमणीय तटाकीं    अमर मळा प्रतिभेचा बहरे
'समर्थ' वाणी जन. जागवी    'देवल' देती नाटयभूषणें
'साधुदास, यशवंत, गिरीशहि    काव्यविहारी' रसमय कवनें-
अर्पुनि रसिकां तुझ्या प्रसादें    दीप उजळती भवितण्याचे
भाग्य नसे तें परंतु माझें    काच न पावे मोल हिऱ्याचें !

गेलों भटकत दूर कुठे मी    दोरी तुटतां पतंग जैसा
मेणघरें तीं विरलीं पडतां    परिस्थितीचा उलटा फासा
पसरे पुढती रुक्ष सहारा    भक्ष्य होत मी दुर्दैवाचें
जीवनकलहीं शिणली काया    लांछन जडलें पराजयाचें
प्रेम तुझें परि मला सावरी    उपकारांचें फिटे कधी ऋण ?
अश्रूंची ही ओंजळ वाही,    दुःख गमे जणुं गरिबांचें धन
गार जळाच्या शिडकाव्यानें    दाह शमविला तप्त जिवाचा
अंकीं तुझिया ठेवुनि माथा    वाचित गाथा काळोखाचा
दिन कंठावे गात थोरवी    स्निग्ध तुझ्या छायेंत माउली,
बाळगिली मी आस उराशीं    आजवरी ती सफल न झाली !

# कशाला खेद करूं !

( जाति- सृष्टिलता )

कशाला, खेद करूं मी तरी !
बाळपणींचा रम्य हरपला रत्ननिधी तो जरी

ओसरलें तें ऊन कोवळें
वात्सल्याचें अमृत विटलें
मुग्ध मनाची मावळली ती अद्भुत अलकापुरी

लोपुनि हिरवळ उरले काटे
किती रुक्षता भंवती दाटे !
लाटांसगें वहात जाती गोड सोबती दुरी

अज्ञानातिल आनंदाचे
तेवी बालिश त्या लीलांचे
गाती जन हे खुळे गोडवे, त्यांत न गोडी खरी !!

थांबे कधि कां सृष्टीचा क्रम ?
व्यर्थ जिवाला पडतो संभ्रम
वास्तवतेचे घेत पाठ मी जातें पुढें सत्वरीं

तारुण्याची दुपार झाली
आग पेटली वरती खालीं
खडकांतुनि या कांचनलेणीं कोरिन यत्नें परी

युद्धपर्व हें जीवनीं
दिशा धुळीनें गेल्या झाकुनि
ठेविन फडकत उंच पताका घाव झेलतां उरीं

चितळे पहिलें चिमणें जग तें
विश्व अवतरे विशाल तेथें
भवितव्याची घडते मूर्ती पराक्रमाच्या करीं !

रक्ताळुनि ही काया निथतां
ध्येयगिरीचा गांठिन माथा
उधळित सुमनें हसरी संध्या स्वागत माझें करी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम ८३८३४ वि: काव्य
नोंद २०८८ ग्रं. दि: ७३।८९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ९४७९

# वडाच्या सावलींत

( जाति-सूर्यकांत )

खांधावरती मखमालीचा मोहरला ताटवा
घालित रुंजी भंवती रमला मधमाशांचा थवा
तांबुस पिवळ्या उन्हांत चिमणीं तृणपातीं डोलतीं
मोही नयनां वटवृक्षाची श्यामल भव्याकृती !

त्यास रंगवी ढळत्या रविचा सोनेरी कुंचला
यक्षिणिनें कीं रम्य मनोरा जादूचा निर्मिला
खेळे विजनीं शांतिसवें ती नित्य नवी मोहनी
विद्ध मनाच्या कळा लोपती स्निग्ध तिच्या दर्शनीं

नकळत तेथे वळलीं माझीं जडावलीं पाऊलें
हिरवाळीचें गीत मनोहर सावलींत त्या झुले
पारंब्यांचा गोतवळा तो आसपास दाटला
सृष्टिसखीचा विशाल हिरवा कारंजा प्रगटला !

नीरव जागीं जसा विरागी ध्यानसुखा अनुभवी
पसरे त्याच्या प्रशांत वदनीं प्रसन्नतची छवी
विराट देहीं दाट उमटल्या काळनखांच्या खुणा
उन्नत ठेवी मस्तक अपुलें धैर्यबळें तो पुन्हा

वेत विसांवा घुमवी पावा गोप गुरांसंगती
सिद्ध सखा हा सदा भागल्या पथिकांच्या स्वागतीं
कटिखांद्यावरि अल्लड खारी बागडती आवडी
श्रांत खगांची वनीं लाडकी पडशाळा ही खडी !

दिनरजनींच्या गुपितांचा जणुं साक्षिदार भासला
भूदेवीचा विजयस्तंभचि अविचल हा राहिला
काढुनि यत्नें विस्मृतिच्या कीं खोल भुयारांतुनी
गतगोष्टींचा संग्रह उघडी संशोधक वा कुणी !

गोल निळ्या घुमटाला खुलवी वासंतिक सांज ती
शिणल्या गात्रीं कष्टाळू जन परत घरा चालती
माळावरुनी मुरडत पाउलवाट नागिणीपरी
बिलगुनि पुढल्या राजपथाला सांगे कांहीतरी !

हरित मनोहर पर्णमंडपीं जीर्ण समाधी दिसे
जीव अनामिक तिथे एकला चिरनिद्रा घेतसे
जात चिरा शेवाळुनि सारा, निखळे वरचा तुरा
मग्न विचारीं करित मला तो भग्न तिचा चौथरा

उंच नभा सधनांचीं भिडलीं धवळारें दूर तीं
गरिबांचीं हीं सान तणारें खचलीं इकडे किती !

विश्रम मानवी संसाराचें चित्र ठसे लोचनीं
संघर्षाचें संतत घडतें रामायण त्यांतुनी

तीक्ष्ण विळा परजुनी आपुला काळपुरुष ठाकला
अमित पिकांनीं डवरुनि आला उभ्या जगाचा मळा
सुटे न एकहि काडी त्याच्या भेदक नजरेंतुनी
युगवीणा करुणेचे पाझर खेळविते जीवनीं

हिमशीतल तो हात लागतां वीर-मनें गोठतीं
उष्णश्वासें किरिटांसह ते राजदंड वितळती
चरणस्पर्शें गडगडतीं कशि सगर्व सिंहासनें
एकच तो हुंकार लोपवी सर्व यशोभूषणें !

वेढी पुरता विश्वपसारा संहारक पाश हा
दहा दिशांतुनि महासागरीं प्रवाह शिरती पहा !
रावरंक वा काळागोरा तेवि मुका बोलका
भेद मुळी नच, सकलांची ही शेज असे मृत्तिका !

सजली येथे खेडवळांची भोळी दुनिया खरी
नांगरलेलीं खुलतीं शेतें नवतीच्या अंकुरीं
मीठभाकरी आणि कांबळी दौलत ही शोभली
श्रमधाग्यांनीं ग्रामकुलांची अमरकथा गुंफिली

भाव विलासी, शब्द लाघवी, कृत्रिम तीं बंधनें
मानधनाची वेडी स्पर्धा, कुटिल राजकारणें
छंद नागरी जनतेचे हे सहसा नच बाधती
खेडुतांस, ते जीवित साधें शांतपणें कंठिती

अज्ञ भावडया देशबांधवां हीन लेखुनी कसे
अम्हीं मिरवतों शिरीं खोवुनी ज्ञानकलेची पिसें
येतिल उदया यांतुनि नेते योग्य संधि लाभतां
मायभूमिला गौरविती जे दावुनि तेजस्विता !

क्षुद्र अशा कीं धूलिकणांतहि गूढ वसे दिव्यता
तिनें एकदा मानवतेच्या जागविलें दैवता
फोडुनि धीरें कोट रूढिचे ज्ञानेश्वर ये पुढें
उभारुनी ध्वज तुकाराम तो बोल ऐकवी खडे

गोड हासरीं फुलें बिचारीं रानीं कोमेजतीं
जलधीच्या तळघरांत लपलीं अमोल रत्नें किती
जाते वांया मधुरगुणांची रसिकाविण देणगी
खऱ्याहुनी तें कौतुक होतें नकलेचें या जगीं !

काजळछाया चढे निशेची झरझर चोहीकडे
एकान्तीं परि अबोल कसली ओढ जिवाला जडे !
श्रवणीं मंजुळ किणकिणती स्वर आरतिचे लांबुनी
घनांधकारीं मंद झळकती प्रकाशलहरीं झणीं

# उघड तूं पंख !

(जाति-सृष्टिलता)

उघड तूं, पंख झणीं आपुले
ओलांडुनि हें कुंपण हिरवें अंगण गांठी निळें !

कुरवाळुनि तव देह कोवळा
कवळ सुधेचा मुखीं घातला
ऊब कुशीची देउनी तुज मी आजवरी पाळिलें

वितळे मोहन अज्ञपणाचें
मावळलें वय पराश्रयाचें
शिंपुनि आतां निढळाचें जळ पिकवायाचे मळे !

सबळ तुझीं हीं खुलतीं गात्रें
विरतीं ममतेचीं मृदुसूत्रें
तुला वाहती तुझे सोबती दूर सुखें चालले

न ये राहतां येथे तुजला
तें न परवडे मलाहि बाळा !
ऐकवितां कटुबोल तुला हे अन्तर दुःखें उले

मिळत सावली सतत कुणाला ?
लोभ आंधळा वैरी गमला
ठरेन मी अपराधी लोकीं सत्य झाकितां बळें

नवतेजाची लागे चाहुल
पुसुनी डोळे उचली पाउल
शूर मनाला सदा यशाचें दार असे मोकळें !

यत्नें करितां जीवन सुंदर
नंदनवन तें नांदे भूवर
होत खरी मी धन्य पाहतां भाग्य तुझें आगळें

विरहांतुनि या जागे मंगल
भाविकाल हा पुढती उज्ज्वल
उधळित कांचनकुंभ पथीं तव जयजयकारीं झुले

स्फूर्तिध्वज ने मिरवित जगभर
भेदी हृदया तीक्ष्ण जरी शर
त्या मरणांतहि अमरपणाची माला कंठीं रुळे !

# सदाफुली

( मुक्तछंद )

शोभली मनोहर ही सदाफुली
दारीं माझ्या अक्षय ज्योतीपरी
मधुर तिच्या स्मितलहरींनीं
उजळे निरंतर घर माझें
गोजिरवाणी गोंडस चिमणीं फुलें
हासत डोलतां लडिवाळपणें
खुणावितीं कशीं मजसी पुन्हा !
शुभ्र रेशमी त्या पाकळ्यांवरी
लहरे किती नाजूक गुलाबी छवी
शीतळ कोवळ्या चंद्रकरांना
लाजऱ्या उषेच्या अधरदलाची लाली
देउनी गोड कुणी जादुगारिणीनें
बनविलीं त्यांचीं मोहक हीं सुमनें

सुखदायी तव संगतीची सखे !
ती सजीव जणूं साजे प्रतिमा
किती रमणीय त्या चैत्रमासीं
सृष्टिवधू ल्याली नवयौवनाचीं लेणीं
आकाश खुलतां मंद संधिप्रकाशें

चारुनी बघे नाचरी तारा
उभारी हसरी दिशा स्वर्णपताका
झंकारतां मंजुळ आशेची सारंगी
या सदाफुलीचें सानुलें रोप तें
लाविलेंस तूं माझ्या मोकळ्या अंगणीं !
रुक्षपणा लोपुनी झणीं त्याला
सुरम्यतेची चढली स्निग्ध कळा

आठवतो दिन तो मज अजुनी
आकस्मिक आपुल्या भेटीचा !
निघाली होतीस तूं लगबगीनें
गूढ नादांत रंगलें भान तुझें
सहज तुझी हालचाल ती मोहवी मना
अवचित पथीं पाऊल तव अडखळुनी
डोळ्यांतलें चंचल तें स्वप्न वुजलें
पाहुनी मजला पुढें ऊर तुझें धडधडे
अवखळ पदरही तशांत देत दगा
त्याला सावरितां तुझ्या हातांतुनी
कसला तरी कागद गळुनी पडे
द्यावया तुला तो उचलुनी मी घेतां
मम हृदया विस्मयाचा बसला धक्का !
चित्र माझें अन् तें तुझ्यापाशीं

कसें कोठुनी आलें कळेना
उघड तुझी अशी होतां चोरी
झालीस तूं कशी गोरीमोरी !

प्रणयाची तऱ्हा ही निराळी
तीच परी गमली संजीवनी मजला
आकांक्षेची अमर मोहनवेली
तिनें फुलविली माझ्या अन्तरीं
वसे तुझ्या करीं अतुल जादू गडे !
आनंदें नटली अवघी दुनिया
साहुनी मजसाठीं जहरी जननिंदा
लाविलीस माझ्या ओठीं अमृताची वाटी
आशय जीवनाचा विशद करुनी तुंवा
ध्येयास्तव झगडाया दिली स्फूर्ती मला
लाभली तुझ्यासम प्रेमळ सहचरी
दरवळला सुखाचा सुवास संसारीं
भाग्यवंत मी होत खरा या जगीं !

# रानपरी

( जाति–बालानंद )

घेत लकेरी मनहारी
ये नाचत ही रानपरी !
गुंगत नादें हर्षभरें
हिरवाळींतुनि स्वैर फिरे
अस्फुट कांही गोड वदे
हासत उचली मंद पदें
लाजुनि बघतां सहज पुन्हा
हळुच कुणाला करित खुणा ?

सुरगंगेपरि गौर तनू
रम्य वसन तें इंद्रधनू
साजे कंठीं दंवमाला
रशना कटिला चंद्रकला
नेत्र निळे ते शुक्र जुळे
कमलकळी वदनीं उमले
अधरीं माणिकरंग ठसे
गेंद गुलाबी गाल जसे

वनदेवाची मधुवेणू
घुमवी मंजुळ बोल जणूं

मधुर उषेचें स्वप्न खुले
दिव्य मोहिनी गात झुले
प्रणयकथा ही चंदेरी
चैत्रवधू विलसे हसरी
अक्षय कीं यौवनवेली
नवसौंदर्यें मोहरली

नाजुक पुतळी पवनाची
उकली गुपितें कलिकांचीं
उधळित भंवती मधुलहरी
किति मोहक ती खेळ करी
रुणझुण छायागण लहरे
धरिती झुळझुळ ताल झरे
यक्षपुरीची स्वर्णमया
सुखवी किमया कशि हृदया !

दिसतां तिजला दीन कुणी
पुसते त्याचे अश्रु झणीं
हिरमुसली विरहें तरुणी
हसवी तिज ही प्रियवचनीं
करुनी पंखा पदराचा
शीण निवारी पथिकाचा

स्नेहल जशि आशाराणी
उजळी जगता स्मितकिरणीं !

लाभे मजला बालपणीं
मैत्रिण ही गोजिरवाणी
वनीं विहरतां तिजसंगें
जीवन रंगे नवरंगें
ढळले दिन सुखदायि जरी
अढळ असे ती प्रीति खरी !
भेटुनि रात्रीं शांत मला
फुलवी सुकल्या भावदलां

# कधीं ?

( जाति-नववधू )

तुज सर्व ठिकाणीं मी बघतें
परि भेट कशी ती नच घडते !

दंवमोत्यांनीं खुलवित रानें
अरुणकरांचें अुधळित सोनें
जागविसी मज खगवाणीनें
        दरवळतीं पवनीं तव गुपितें:

खुलत नभीं तव सुनील कांती
तृणांकुरीं मृदुपदें अुमटतीं
मधुर तुझे स्वर निर्झर गाती
        सुम-दलीं अुमलतीं मधुस्मितें,

चैत्र तुझ्या निःश्वसना लहरे
चंद्रघटांतुनि सुधा पाझरे
सौंदर्यें अणुरेणू बहरे
        त्या दिव्य कलेनें मन रमतें

मुग्ध शिशूंच्या अस्फुट वचनीं
तरुण जिवांच्या आतुर नयनीं
वृद्धांच्या सुरकुतल्या वदनीं
        तव गूढ भाव मी ओळखतें:

जादुगार तूं या दुनियेचा
थाट मिरवितां सम्राटाचा
सेवक बनसी दीनजनांचा
थोरवी तुझी ही आळवितें

कधी उपवनीं रम्य सकाळीं
शांत सागरीं सायंकाळीं
चांदण्यांत कधि घोर वादळीं
तूं खेळ दाविसी बहुविध ते !

गहन तमीं पाजळसी ज्योती
होतीं स्फुरणें दिव्य उरीं तीं
क्षुद्रपणाचीं पटलें गळतीं
प्रीतिनें तुझ्या हें जग फुलतें

व्यापिलेंस जरि अवघें जीवन
तुझें एकदा व्हावें दर्शन
हृदय निवेना माझें त्याविण
हळु सांग सख्या, कधि येशिल तें

# गुलाबी सांज

( जाति-सूर्यकला )

थांब सखे क्षणभरीं
कुठें तूं, जाशी बिजलीपरी ?

शांत मनोहर सायंकाळीं
सहज तुला मी आज पाहिली
बालपणींच्या राघूमैना
किलबिलती अन्तरीं

गर्द सावळ्या बकुळीखालीं
मोहरली ती प्रीती पहिली
खूण जीवाची तुला सांगतां
राहिलीस कां दुरी ?

उन्हांत पिवळ्या न्हालीं रानें
रम्य पुन्हा तीं खुलतीं स्वप्नें
पहा मजकडे गडे, एकदा
गोड हासुनी तरी

रुसण्याची तव रीत निराळी
नव्हती मैत्री जणूं आपुली !
करी दंग ही परी मनाला
नजर तुझी नाचरी

सांज गुलाबी अुजळी गगना
क्षण सोन्याचा सुखवी नयनां
खुदकन् हसतां चंद्र लाजरा
ओळख पटली खरी !

# कोंडाकणी

( जाति-झोलारती )

तव गोड लाभली जोड मला साजणी
अुगवली जीवनीं सोनेरी पर्वणी
अुजळीत लाजऱ्या नजरेनें अुम्बरा
त्वां पर्णकुटीचा स्वर्ग बनविला खरा !

स्वर कानीं मंजुळ सनअीचे नाचती
पटवीत अेकता पदरांची गांठ ती
हळदीच्या हातीं साजे हिरवा चुडा
ओठांत हासऱ्या भरला अमृतघडा

पाहिलें प्रथम त्या निर्झरकांठीं तुला
पालवला हृदयीं प्रेमांकुर कोवळा
पसरतां भूतळीं चंदेरी मोहिनी
परिमळलीं रानीं गुपितें वाऱ्यांतुनी

मी शेतकरी हा साधा भोळा असे
परि तुझ्या संगती वाण कशाची नसे
ही दौलत बघतां कुबेर लाजे मनीं
"मज कोण भिकारी म्हणेल आतां जनीं" !

या स्वेदफुलांनीं धरितीला पूजितां
चल गुंफूं सुंदर संसाराची कथा
शोभली पलिकडे आंब्याची राहुटी
ती करी उन्हाची क्षणांत चंदनउटी

ये उधळित मोती गगनीं घन सावळा
पाचूचे फुटती पंख नवे मातिला
जी मिळे श्रमाची निर्मळ कोंडाकणी
ती सेवुनि होऊं जगीं सुखाचे धनी !

# चिमणा स्वर्ग

(छंद–पादाकुलक)

दूर एका शांत जागीं
सान रोपें लाविलीं मी
निगा त्यांची राखितांना
दिनरात झालों श्रमी

आवडीनें वाहुनी त्यां
निर्झरांचें नीर घाली
आंदोलती डोळ्यांपुढे
गोड कल्पनांच्या वेली

किती हावरीं तीं गुरें
खातीं कोवळी पालवी
जपे जिवापाड तरी
नित्य उपाधी ये नवी

धूर्त कसे वाटसरू
नेती गुपचूप कळ्या
उभारिला कुंप मी, तो
मला दाखवी वाकुल्या

फूल मिळेना पूजेला
रुसे देव माझ्यावरी
वितळे ती स्वप्नमाला
सकाळच्या धुक्यापरी

कोणा सांगावें गाऱ्हाणें !
ताण जीवा लागे भारी
मीच झालों चोर काय
न्याय दुनियेचा तरी !

आटे गगनाचा पाऱ्हा
आसमंतीं पेटे आग
नुरे अश्रूविना पाणी
फुले कधी माझी बाग ?

राहे वेड्यापरी उभा
सले उरीं आशा मुकी
कोमावल्या अंकुरांना
कुरवाळी सांजसखी

मोही मना वरुणाच्या
करुणेची सोनझारी
वादळी तों वेताळाची
घुमे आरोळी अम्बरीं

वाजे आसूड विजेचा
नाचे धुंद निशा कशी !
दुखावल्या तरुबाळां
धरी पृथ्वी हृदयाशीं

भेदुनी तो बांध काळा
धार वाहे अमृताची
दिव्य प्रीतीच्या स्पर्शानें
निवे ज्वाला निराशेची
आली सानन्द कोकिळा
कंठबासरी छेडीत
रम्यतेच्या पैंजणांनीं
रुक्षता हो रोमांचित
फोफावलीं फुलझाडें
दिशा विस्मयांत दंग
झुले वसंताचा मेळा
साजे चिमणा तो स्वर्ग !
नव्या जीवनाची गुढी
उषा जगीं उभारीत
प्रकाशाच्या संगीताला
मिळे सुगंधाची साथ

# वळणापाशीं

( जाति-धवल चंद्रिका )

भरुनि येत हृदय किती तुज निरोपितां
भेट कधीं घडत सख्या, आपुली अतां ?

ओळखिचा क्षण पहिला आठवे मला
संजीवक गमला तो बोल मोकळा
मोहरला सहज मनीं भाव कोवळा
होत सदा सुखदा ती तव उदारता

प्रेमळ तव सहवासीं जीव रंगला
जगतीं मज दुर्लभ कीं सुहृद भेटला
गौरविसी सान गुणा वाहुनी कळा
अनुपम ही आपुलकी, धन्य रसिकता !

जीवनांत जणुं अमृतमेघ वोळला
प्रीतीचा मोतिमळा छान बहरला
प्रिय माझा सहचर मी मानिला तुला
रम्य नवा निर्मियला स्वर्ग उभयतां

अेकमतें आपण ते दिवस कंठिले
बहुरंगी दुनियेचे खेळ पाहिले

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम 73 C20 वि: काव्य
ग्रंथांक 2068

हसतमुखें मधुरों बोल बोलिलां फळें
साथ दिली गहन तमीं जागुनी हिता

[illegible] आभे लोकीं परि नित्य चांगलें
गालबोट मृदुसुखा अटळ लागलें
अल्पकाळ निर्मळ जरि सख्य हें मिळे
त्यांत तरी घडत खरी अटळ दिव्यता

झुलतां हळि दोन फुलें वाहत्या जळीं
चपल अशी लाट करी त्यांस वेगळीं !
रीत अशी संसृतिची सतत चालली
करुणरसें प्रणयकथा अधिक रंगतां

क्षितिजावर सांजकळा मंद पसरली
या वळणाजवळीं मम चाल खुंटली
स्फुंदत ही विरहाची रात्र पातली
ऐकव मधुबोल झणीं त्यजुनि मूकता

अश्रूंचा हार तुझ्या घालितां गळां
हृदयाशीं एकवार घे पुन्हा मला
येथुनि हा पथ झाला भिन्न आपुला
वघ, हसुनी पुढती जड पाय उचलतां !

८४९

REFBK-0009419

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम 73826 वि: काव्य
दिनांक 2068

हसतमुखें [illegible] फुलें
साथ दिली गहन तमीं जागुनी हिता

[illegible]व असे लोकीं परि नित्य चांगलें
गा[illegible]सुखा अटळ लागलें
अल्पकाळ निर्मळ जरि सख्य हें मिळे
ठाणे 8849
त्यांत तरी [illegible]डत खरी अढळ दिव्यता

जुळतां हळूं दोन फुलें वाहत्या जळीं
चपळ अशी लाट करी त्यांस वेगळीं!
रीत अशी संसृतिची सतत चालली
करुणरसें प्रणयकथा अधिक रंगतां

क्षितिजावर सांजकळा मंद पसरली
या वळणाजवळीं मम चाल खुंटली
स्फुंदत ही विरहाची रात्र पातली
ऐकत्र मधुबोल झणीं त्यजुनि मूकता

अश्रूंचा हार तुझ्या घालितां गळां
हृदयाशीं एकवार घे पुन्हा मला
येथुनि हा पथ झाला भिन्न आपुला
वघ, हसुनी पुढती जड पाय उचलतां!

REFBK-0009419

REFBK-0009419